दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२२५ | गुरूवार दि.०५ नोव्हेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय....

प्रशासकीय पारदर्शकतेची ऐशीतैशी: संपत्तीच्या डिक्लेरेशनचा केवळ 'कागदी देखावा'?

सरकारी सेवेत असलेल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दरवर्षी आपली स्थावर व जंगम संपत्ती जाहीर करणे, हा पारदर्शक कारभाराचा पाया मानला जातो. मात्र, प्रत्यक्षात हा नियम म्हणजे केवळ एक औपचारिक 'कागदी देखावा' बनला आहे का, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. 'द इंडियन एक्स्प्रेस'चे पत्रकार शामलाल यादव यांनी केलेल्या एका शोधपत्रकारितेच्या तपासातून भारतातील सनदी प्रशासनाच्या उच्च वर्तुळातील पारदर्शकतेचे विदारक चित्र समोर आले आहे.देशाचा गाडा हाकणाऱ्या आणि धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या १०२ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या मालमत्ता विवरणाची छाननी केली असता, ही माहिती जनतेच्या डोळ्यात केवळ धूळफेक करणारी असल्याचे स्पष्ट होते.

थोडक्यात...

दुष्काळामुळे मनसेचा दिपोत्सव रद्द–राज ठाकरे

मुंबई: महाराष्ट्रातील भीषण दुष्काळी परिस्थिती पाहता, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी यावर्षी मुंबईतील शिवाजी पार्कवर आयोजित केला जाणारा आपला वार्षिक दीपोत्सव रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. एका व्हिडिओ संदेशाद्वारे राज ठाकरे यांनी राज्यातील जनतेला दिवाळी साजरी करताना संयम पाळण्याचे आवाहन केले आहे. ग्रामीण महाराष्ट्र भीषण दुष्काळाच्या छायेत असताना, शेतकरी आर्थिक संकटात सापडलेले असताना आणि हजारो लोक दुष्काळामुळे शहरांकडे स्थलांतर करत असताना, सण थाटामाटात साजरा करणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. परिस्थिती सुधारल्यास, पुढील वर्षी दीपोत्सव आयोजित केला जाईल, असेही राज ठाकरे यांनी सांगितले. मनसेच्या या दीपोत्सवाला दरवर्षी हजारो नागरिक उपस्थित असतात. मुंबईतील ऐतिहासिक शिवाजी पार्क आणि परिसर दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघतो, तसेच येथे फटाक्यांची आतषबाजीही केली जाते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अनेकदा प्रतिष्ठित व्यक्तींच्या हस्ते केले जाते.

राहुल गांधी विझलेले रॉकेट–योगी आदित्यनाथ

गोरखपूर : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची तुलना उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी फटाक्यातील वात विझलेल्या रॉकेटशी केली. काँग्रेसने राहुल गांधी यांना राष्ट्रीय नेते म्हणून प्रस्थापित करण्यासाठी वारंवार राजकीय लॉन्चिंग केले, मात्र प्रत्येक वेळी हा प्रयत्न अपयशी ठरला, असा घणाघाती टोला त्यांनी लगावला. गोरखपूर येथे आयोजित लोकतंत्र वाचवा, अराजकता हटवा या एनडीएच्या रॅलीत ते बोलत होते. सभेला संबोधित करताना योगी आदित्यनाथ म्हणाले, दिवाळीत आपण अनेकदा रॉकेट उडवतो. पण काही रॉकेटची वात पेटवल्यानंतरही ते उडत नाहीत. लोक आकाशाकडे पाहत राहतात, पण ते रॉकेट तिथेच राहून फक्त धूर सोडते आणि विझून जाते. राहुल गांधी यांची परिस्थिती अगदी तशीच आहे. राहुल गांधी यांना प्रस्थापित करण्यासाठी काँग्रेसने केलेल्या प्रयत्नांची यादी मांडत योगी म्हणाले की, २००४ ते पहिल्यांदा लोकसभा खासदार झाले. २००७ मध्ये त्यांना पक्षाचे सरचिटणीस पद देण्यात आले. २०१३ मध्ये राहुल यांना काँग्रेसचे उपाध्यक्ष बनवले. २०१७ साली त्यांची पक्षाध्यक्षपदी निवड झाली. २०१९ या वर्षी अमेठी लोकसभा मतदारसंघातून त्यांचा पराभव झाला. राहुल गांधी आता ५६ वर्षांचे झाले आहेत, तरीही त्यांना अजूनही तरुण नेते म्हणून सादर केले जात आहे. हे रॉकेट कधीही टेक-ऑफ करू शकणार नाही, असा टोला त्यांनी लगावला.

गोकुळ गुजरातच्या घशात घालण्याचा भाजपचा डाव

मुंबई: कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. बहुमताचा अनादर करत आणि नियम बदलून गोकुळ संघ बळकावण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. नवीन कायदा, नियम आणतात आणि त्यानुसार एक्सपर्ट चार संचालक घुसवून स्वत:चे बहुमत करून गोकुळ संघ ताब्यात घेण्याचा प्रयत्न आहे. तो लोकशाहीविरोधी आहे, असे राऊतांकडून स्पष्टपणे सांगण्यात आले. यावेळी त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही जोरदार हल्लाबोल करीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाही खडेबोल सुनावले आहेत.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०४ नोव्हेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: २३.०० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,७००	३,६००	३,०७८

ज्वारी/हायब्रिड : २४.५० क्विंटल

३,६००	८,५००	५,३०९

मका/लोकल: १.०० क्विंटल

२,३००	२,३००	२,३००

तूर : ५.००क्विंटल

७,४००	९,८००	८,७३३

उडीद :१.५० क्विंटल

८,९८१	८,९८१	८,९८१

बाजरी: २३.०० क्विंटल

३,१८०	३,६०१	३,३७३

मुग: २.०० क्विंटल

९,२००	९,३०१	९,२५०

सोयाबीन: १४२.०० क्विंटल

६,७००	६,९२५	६,८४२

हरभरा: ४.५० क्विंटल


५,८००	७,१५०	६,५१३

केवायसी, वारस नोंदींच्या अडचणी असल्या तरी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणारच!

एकही पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही; महसूलमंत्री बावनकुळेंची ग्वाही

मुंबई । प्रतिनिधी

केवायसी, बँक खाते आणि वारस नोंदींच्या तांत्रिक अडचणींमुळे राज्यातील अनेक शेतकऱ्यांची कर्जमाफी रखडली असली, तरी एकही पात्र शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची शासनाची भूमिका असून, तांत्रिक अडचणी दूर करून ही योजना पूर्ण केली जाईल, अशी ग्वाही दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. त्यामुळे कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.



महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जमाफीची घोषणा केली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी पात्र शेतकऱ्यांच्या आतापर्यंत चार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मात्र, याद्या जाहीर होऊनही अनेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जमाफीचा लाभ मिळालेला नाही. काही शेतकऱ्यांची नावे पात्र यादीत येण्यापासूनच अडचणी निर्माण झाल्या आहेत, तर काहींच्या कर्जमाफीची प्रक्रिया केवायसी आणि बँक खात्यांशी संबंधित त्रुटींमुळे रखडली आहे. त्यामुळे कर्जमाफीची घोषणा होऊनही प्रत्यक्ष लाभ कधी मिळणार, असा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्री बावनकुळे यांनी महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले आहे. शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया जसजशी ▶▶ पान २ वर

चार याद्यांनंतरही प्रतीक्षा कायम

कर्जमाफी योजनेच्या चार याद्या प्रसिद्ध झाल्यानंतरही अनेक शेतकरी अद्याप लाभाच्या प्रतीक्षेत आहेत. विशेषतः कागदपत्रांतील त्रुटी, केवायसी अपूर्ण असणे, बँक खाते बंद किंवा मयत कर्जदाराच्या नावावर असणे, तसेच वारस नोंदींचे प्रश्न यामुळे पात्र शेतकऱ्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. शासनाने या अडचणी दूर करून पात्र लाभार्थ्यांना लवकरात लवकर लाभ द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रक्रिया पूर्ण करण्याची सरकारची ग्वाही

कर्जमाफीच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींमुळे कोणत्याही पात्र शेतकऱ्याचे नुकसान होऊ दिले जाणार नाही, असे आश्वासन बावनकुळे यांनी दिले आहे. केवायसी पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट केली जातील. वारस नोंदी आणि बँक खात्यांशी संबंधित अडचणीही सोडविण्यात येतील. त्यामुळे तांत्रिक कारणांमुळे कर्जमाफी रखडलेल्या शेतकऱ्यांनी काळजी करू नये. राज्यातील एकही पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार नाही आणि शासन ही योजना पूर्ण करणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सिल्क साड्यांना बाजारपेठ उपलब्ध करणार-पंकजा मुंडे

ग्रामीण महिलांना रेशीम उद्योगाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील रेशीम उद्योगाला चालना देऊन येथील सिल्क साड्यांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करण्यात येतील. तसेच ग्रामीण भागातील महिलांना रेशीम उद्योगाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आवश्यक सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरणमंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली.



पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी बदनापूर तालुक्यातील वरुड येथील गणेश सिल्क इंडस्ट्रीज आणि जालना तालुक्यातील खरपुडी येथील कृषि विज्ञान केंद्र परिसरातील रेशीम हातमाग प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन तेथे सुरू असलेल्या रेशीम साडी विणकामाच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी महिलांकडून प्रत्यक्ष सुरू असलेल्या विणकामाची माहिती जाणून घेतली. रेशीम साडी तयार करण्याची प्रक्रिया, उत्पादन आणि या उद्योगातून महिलांना मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी याबाबतही त्यांनी संबंधितांशी चर्चा केली. जालना जिल्ह्यात तयार होणाऱ्या सिल्क साड्यांना देशांतर्गत बाजारपेठेसह जागतिक स्तरावर ओळख ▶▶ पान २ वर

दोनपेक्षा जास्त अपत्यांवर दंडाचे कायदे कालबाह्य–सर्वोच्च न्यायालय



नवी दिल्ली । वृत्तसंस्था


दोनपेक्षा जास्त अपत्ये असलेल्या व्यक्तींना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यापासून अपात्र ठरवणारे कायदे, भारताच्या घटत्या प्रजनन दराच्या पार्श्वभूमीवर कालबाह्य झाले आहेत, असे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. लोकसंख्याशास्त्रीय बदलांमुळे अशा निर्बंधांमागचा मूळ उद्देशच नष्ट झाला असल्याचेही निरीक्षण नोंदवत न्यायालयाने 'जावेद विरुद्ध हरियाणा राज्य' (२००३) प्रकरणातील निकाल एका मोठ्या खंडपीठाकडे वर्ग केला आहे. या प्रकरणात तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने 'हरियाणा पंचायती राज कायदा, १९९४' ची घटनात्मक वैधता कायम ▶▶ पान २ वर

नियमाच्या समर्थन करणाऱ्या तर्कावरही खंडपीठाने व्यक्त केली चिंता

न्यायालयाने 'जावेद विरुद्ध हरियाणा राज्य' खटल्यात दोन अपत्यांच्या नियमाचे समर्थन करण्यासाठी वापरलेल्या तर्कावरही चिंता व्यक्त केली. न्यायालयाने म्हटले की, अशा कायद्यांचे अस्तित्व नागरिकांच्या एका संपूर्ण वर्गाला राजकीय प्रतिनिधित्वापासून वंचित करते, या कारणांमुळे त्यांना अपात्र ठरवले जाते, त्यांचा त्यांच्या सार्वजनिक पदावर काम करण्याच्या क्षमतेशी फारसा संबंध नाही.

फटाके फोडण्यासाठी वेळेच्या नियमाबाबत विचार करा

उच्च न्यायालयाच्या महाराष्ट्र सरकारला सूचना



मुंबई । प्रतिनिधी

दिवाळीच्या काळात फटाके फोडण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना, विशेषतः फटाके फोडण्याच्या वेळेवर नियंत्रण ठेवण्याबाबतच्या सूचना, ▶▶ पान २ वर

विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात दुपटीहून अधिक वाढ

वाहनधारकांनाही दंडात २० टक्के सवलत : मंत्रीमंडळाचा महत्वपुर्ण निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. ४ नोव्हेंबर) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विद्यार्थी, वाहनधारक, पशुपालक आणि सहकार क्षेत्रासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. इतर मागास प्रवर्ग (ओबीसी), विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात दुपटीहून अधिक वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. आता विभागस्तरीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दरमहा १ हजार ५०० रुपये, तर जिल्हास्तरीय



वसतिगृहातील विद्यार्थ्यांना १ हजार ३०० रुपये मिळणार आहेत. याशिवाय वाहनांच्या प्रलंबित वाहतूक दंडासाठी अभय योजना, पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ आणि मोठ्या सहकारी संस्थांवर ▶▶ पान २ वर

यापुढचे निर्णय कोअर कमिटीच घेणार-पार्थ पवार

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सुरु असलेल्या अंतर्गत संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, बुधवारी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक झाली. राष्ट्रवादीमधील वरिष्ठ नेत्यांचा गट हा पार्थ पवार यांच्या कार्यपद्धतीवर नाराज असल्याची चर्चा होती. बैठकीत या सगळ्यावर पूर्ण तोडगा निघाला नाही. मात्र, पार्थ पवार यांनी या बैठकीत इथून पुढे कोअर कमिटीला विचारुन निर्णय घेतले जातील, असा शब्द दिल्याची माहिती आहे.



या बैठकीला पक्षाध्यक्षा सुनेत्रा पवार, नेते पार्थ पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, कमिटीचे सदस्य दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, समीर भुजबळ, धनंजय मुंडे उपस्थित होते. कोअर कमिटीच्या बैठकीत पक्षांतर्गत सुरू असलेल्या वादावर पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार ▶▶ पान २ वर

अग्निवीरांना दिवाळीची मोठी भेट; दोन वर्षांची सेवा मुदतवाढ!

२५ टक्के अग्निवीर नियमित सेवेत; उर्वरित ७५ टक्क्यांनाही पुन्हा संधी, केंद्रीय मंत्रिमंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने अग्निवीरांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत मोठी भेट दिली आहे. अग्निपथ योजनेअंतर्गत चार वर्षांचा सेवाकाळ पूर्ण करणाऱ्या अग्निवीरांपैकी २५ टक्के जवानांना गुणवत्तेच्या आधारावर नियमित सैन्यात सामावून घेतले जाणार आहे, तर उर्वरित ७५ टक्के अग्निवीरांच्या सेवेत आणखी दोन वर्षांची वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळे या अग्निवीरांना



आता सशस्त्र दलांमध्ये एकूण सहा वर्षे सेवा करण्याची संधी मिळणार आहे. दोन वर्षांचा अतिरिक्त सेवाकाळ पूर्ण झाल्यानंतर कामगिरीचे मूल्यमापन आणि निश्चित निवड निकषांच्या आधारे त्यांना पुन्हा नियमित सेवेत सामावून घेण्याचा विचार केला जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी पत्रकार परिषदेत या निर्णयाची माहिती दिली. १४ जून २०२२ रोजी अग्निपथ योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेनुसार अग्निवीरांची चार वर्षांच्या कालावधीसाठी भरती केली जात होती. त्यानंतर केवळ २५ टक्के जवानांना नियमित सेवेत कायम ठेवण्याची तरतूद होती. उर्वरित ७५ टक्के अग्निवीरांना चार वर्षांनंतर सेवेतून मुक्त केले जाणार होते. मात्र, आता या धोरणात बदल करून त्यांना आणखी दोन वर्षे सैन्यात सेवा करण्याची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जनरल सुब्रमणी म्हणाले की, अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीचा चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्याच्या टप्प्यावर आहे. आतापर्यंतच्या त्यांच्या कामगिरीबाबत संरक्षण दलांना सकारात्मक ▶▶ पान २ वर

शरद पवार यांना रुग्णालयातून डिस्चार्ज

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार गेल्या काही दिवसांपासून दुष्काळग्रस्त भागाच्या दौऱ्यावर होते. दुष्काळी दौऱ्यावर असताना पवार यांना छातीत त्रास सुरू झाला. दोन दिवसांपूर्वी त्यांना पुण्यातील रूबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यांच्या तब्येतीमध्ये सुधारणा झाली आहे. बुधवारी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादी शरचंद्र पवार काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना फोन करत त्यांच्या तब्यतीची विचारपूस केली. त्यांनी शरद पवार यांना विश्रांती घेण्याचा सल्लादेखील दिला आहे. सुप्रिया आता तयार आहेत. आम्ही देश सांभाळू. तुम्ही पूर्णपणे विश्रांती घ्या, असं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पवारांना मोलाचा सल्ला दिला आहे.

अग्रलेख

प्रशासकीय पारदर्शकतेची ऐशीतैशी:संपत्तीच्या डिक्लेरेशनचा केवळ 'कागदी देखावा'?

सरकारी सेवेत असलेल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दरवर्षी आपली स्थावर व जंगम संपत्ती जाहीर करणे, हा पारदर्शक कारभाराचा पाया मानला जातो. मात्र, प्रत्यक्षात हा नियम म्हणजे केवळ एक औपचारिक 'कागदी देखावा' बनला आहे का, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. 'द इंडियन एक्स्प्रेस'चे पत्रकार शामलाल यादव यांनी केलेल्या एका शोधपत्रकारितेच्या तपासातून भारतातील सनदी प्रशासनाच्या उच्च वर्तुळातील पारदर्शकतेचे विदारक चित्र समोर आले आहे.

देशाचा गाडा हाकणाऱ्या आणि धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या १०२ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या मालमत्ता विवरणाची छाननी केली असता, ही माहिती जनतेच्या डोळ्यात केवळ धूळफेक करणारी असल्याचे स्पष्ट होते. या १०२ अधिकाऱ्यांमध्ये केंद्रीय सचिव, पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रपती सचिवालयातील वरिष्ठ सनदी अधिकारी तसेच विविध राज्यांचे मुख्य सचिव यांचा समावेश आहे. या तपासात समोर आलेली आकडेवारी प्रशासकीय व्यवस्थेच्या उत्तरदायित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. किंमत आणि व्हॅल्युएशन गायब: १०२ अधिकाऱ्यांनी स्वतःच्या नावे घोषित केलेल्या २४४ स्व-अर्जित मालमत्तांपैकी तब्बल ११५ मालमत्तांची सध्याची बाजारभावानुसार किंमत विवरणपत्रात नमूदच केलेली नाही. क्षेत्रफळाची माहिती नाही: त्याच ११५ मालमत्तांचे क्षेत्रफळ किती आहे, याचा कोणताही उल्लेख नाही. संबंधित फ्लॅट किंवा जमिनीचा तुकडा १०० चौरस फुटांचा आहे की ५००० चौरस फुटांचा, हे समजण्यास कोणताही वाव नाही. संपत्ती अचानक 'गायब': १० वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतःकडे कोणतीही स्व-अर्जित संपत्ती नाही ('झिरो' मालमत्ता) असे घोषित केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या १० पैकी ९ अधिकाऱ्यांनी आधीच्या वर्षांच्या मालमत्ता विवरणात स्वतःच्या नावे संपत्ती असल्याचे मान्य केले होते. ही संपत्ती अचानक कुठे गायब झाली, तिची विक्री झाली की ती बेनामी झाली, याबद्दल कोणतीही स्पष्टता नाही. नियम, पडताळणी आणि व्यवस्थेचे मौन लोकशाही व्यवस्थेत न्यायाधीशांपासून लोकप्रतिनिधींपर्यंत सर्वांनीच पारदर्शकता पाळणे अपेक्षित आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी स्वतःहून संपत्ती जाहीर करण्याचा कित्ता गिरवला असताना, देशाचे नोकरशहा मात्र माहिती लपवण्याचा लपंडाव का खेळत आहेत? येथे मुख्य प्रश्न उपस्थित होतात: पडताळणीचा अभाव: सनदी अधिकाऱ्यांनी फॉर्ममध्ये काहीही भरून दिले, तरी त्याची शहानिशा किंवा व्हॅरिफिकेशन करणारी कोणतीही सक्षम यंत्रणा सध्या कार्यरत नाही. लोकपाल कायद्याची अंमलबजावणी कधी? २०१३ मध्ये संमत झालेल्या 'लोकपाल कायद्या'अंतर्गत सरकारी अधिकाऱ्यांच्या संपत्ती जाहीर करण्याबाबत अधिक कडक आणि सर्वसमावेशक नियम प्रस्तावित करण्यात आले होते. मात्र, २०१३ नंतर प्रदीर्घ काळ लोटूनही या नियमांची अधिकृत अधिसूचना निघू शकलेली नाही. अपूर्ण किंवा संशयास्पद माहिती देण्याला 'पारदर्शकता' म्हणता येत नाही; ती भ्रष्टाचाराच्या शक्यतांना दिलेली पळवाट ठरते. जनतेच्या करातून वेतन आणि सोयी-सुविधा घेणाऱ्या सनदी अधिकाऱ्यांनी आपली संपत्ती जाहीर करताना अर्थपूर्ण आणि खरी माहिती देणे अनिवार्य आहे. केवळ कायदेशीर पळवाटा शोधून कागदपत्रे भरणे ही लोकशाही मूल्यांची विटंबना आहे. लोकपाल कायद्यातील नियमांची तातडीने अंमलबजावणी करणे, मालमत्ता विवरणाची स्वतंत्र यंत्रणेमार्फत नियमित पडताळणी करणे आणि चुकीची किंवा अपूर्ण माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे - हीच आजच्या प्रशासकीय सुधारणेची पहिली पायरी ठरली पाहिजे.

वडवणी तालुक्यातील सिंचन प्रश्न सोडविण्यासाठी अभ्यासपूर्ण आराखडा तयार करावा-मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

मुंबई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील अप्पर (ऊर्ध्व) कुंडलिका प्रकल्प परिसरातील शेतकऱ्यांची सिंचनाची मागणी लक्षात घेता, अप्पर कुंडलिका प्रकल्पाचे पाणी सध्या अस्तित्वात असलेल्या तलावांमध्ये साठवून त्याद्वारे सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देता येईल का, याची व्यवहार्यता तपासावी, तसेच उपलब्ध जलस्रोत, सिंचनाची गरज आणि संभाव्य लाभक्षेत्र यांचा विचार करून सर्वंकष व अभ्यासपूर्ण आराखडा तयार करावा, असे निर्देश मंत्री मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



वडवणी तालुक्यातील अप्पर (ऊर्ध्व) कुंडलिका प्रकल्प, सोन्नाखोटा डावा कालव्याचे अपूर्ण काम तसेच परिसरातील तांड्यांच्या सिंचनाच्या प्रश्नांवर मंत्रालयात मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत बिचकुलदरा तांडा, सरकारखोरी तांडा आणि चौफाळदरा तांडा परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या परिसरातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अप्पर कुंडलिका प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला. तसेच सोन्नाखोटा डावा कालव्याचे अपूर्ण काम पूर्ण करणे आणि संबंधित तांड्यांच्या परिसरातील लाभक्षेत्र वाढविण्याबाबत चर्चा झाली. मृद व जलसंधारण विभागांतर्गत असलेल्या पाझर तलावांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचनाही मंत्री राठोड यांनी दिल्या. याशिवाय परिसरात नवीन जलसंधारण तलाव मंजूर करण्याच्या प्रस्तावावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. उपलब्ध जलस्रोत, सिंचनाची गरज आणि संभाव्य लाभक्षेत्र यांचा विचार करून सर्वंकष व अभ्यासपूर्ण आराखडा तयार करून सादर करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यामुळे उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करून परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करता येणार आहेत. या उपाययोजनांमुळे बिचकुलदरा, सरकारखोरी आणि चौफाळदरा तांडा परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यास मदत होणार आहे. बैठकीस विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्यासह जलसंपदा व मृद व जलसंधारण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सरपंच जयश्री वरेकर यांना दिलासा, अपात्रतेची तक्रार विभागीय आयुक्तांकडून फेटाळली

शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या राजकीय वर्चस्वाला धक्का देण्याचा प्रयत्न करणारा पडद्यामागील 'सुपारीबहाद्दर' कोण?

बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या पत्नी तथा कुटेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच जयश्री गणेश वरेकर यांना विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी मोठा दिलासा दिला आहे. त्यांच्या विरोधात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३९ (१) अन्वये दाखल करण्यात आलेली अपात्रतेची तक्रार विभागीय आयुक्तांनी फेटाळून लावल्याने त्यांचे सरपंचपद कायम राहिले आहे. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, या तक्रारीमागील राजकीय हेतूंबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

कुटेवाडी (ता. जि. बीड) येथील सरपंच जयश्री वरेकर यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर रस्त्यांची कामे नियोजित ठिकाणी न करता अन्यत्र केल्याचा तसेच कामांमध्ये अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप गावातील रहिवासी तथा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे यांनी केला होता. यासंदर्भात त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करून सरपंचांना अपात्र ठरविण्याची मागणी केली होती. तक्रारीनंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी करून प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविला. विभागीय आयुक्तांसमोर झालेल्या सुनावणीत सरपंच जयश्री वरेकर यांच्या वतीने अॅड. श्रीकांत जी. कवडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. संबंधित कामांच्या ठिकाणांमध्ये ग्रामस्थांच्या सूचनेनुसार आणि ग्रामसभेच्या निर्णयानुसार बदल करण्यात आल्याचे तसेच भ्रष्टाचार अथवा आर्थिक अनियमिततेचे आरोप सिद्ध होत नसल्याचे त्यांनी मांडले. दोन्ही बाजूंचे म्हणणे आणि कायदेशीर बाबी विचारात घेऊन विभागीय आयुक्तांनी अपात्रतेची तक्रार फेटाळली. या संपूर्ण प्रकरणातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे या तक्रारीमागे खरोखरच राजकीय सूडबुद्धी होती का? शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांचे राजकीय वर्चस्व कमी करणे, त्यांची प्रतिमा मलिन करणे आणि राजकीय बदनामी घडवून आणणे, या हेतूनेच नंदकुमार कुटे यांच्यामार्फत ही तक्रार करण्यात



आल्याचा आरोप आता वरेकर समर्थकांकडून केला जात आहे. त्यांच्या मते, हा संपूर्ण प्रकार राजकीय कटकारस्थानाचा भाग होता. मात्र, या आरोपांमुळे आता एक वेगळाच प्रश्न उपस्थित झाला आहे. जर ही तक्रार राजकीय हेतूनेच करण्यात आली होती, तर तक्रारदार नंदकुमार कुटे यांच्या पाठीशी नेमके कोण होते? पडद्यामागून राजकीय सूत्रे हलविणारे ते 'सुपारीबहाद्दर' कोण? कोणाच्या सांगण्यावरून हा संपूर्ण डाव रचण्यात आला होता? या प्रश्नांची उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत. आता विभागीय आयुक्तांनी तक्रार फेटाळल्यानंतर या आरोपांना राजकीय चर्चेत अधिक धार आली आहे. नंदकुमार कुटे हे पडद्यामागील कथित सूत्रधारांची नावे आणि चेहरे उघड करणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. एकीकडे सरपंच जयश्री वरेकर यांचे पद कायम राहिले, तर दुसरीकडे या तक्रारीमागील कथित राजकीय सूत्रधार कोण, हा प्रश्न अनुत्तरित आहे. त्यामुळे कुटेवाडीच्या सरपंचपदाच्या वादापेक्षा आता पडद्यामागील राजकीय खेळाडूंची चर्चा अधिक रंगू लागली आहे.

तहसीलदार समोर कर्मचाऱ्याकडून कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

अंबड । प्रतिनिधी

एक चौकीदार कर्मचारी व दुसरा महसूल सहाय्यक या दोघांमध्ये तुफान हाणामारी व शिवीगाळ ची घटना घडली आरोपी यांनी फिर्यादीला जीव मारण्याची धमकी देण्यात आली. सदरील घटना अंबड तहशील कार्यालयामध्ये तहसीलदार समोर घडली. याप्रकरणी चौकीदार कर्मचारी यांना तहसील कार्यालया मधून कार्यमुक्त करण्यात आले असल्याची माहिती असल्याचे समजते. किरकोळ कारणावरून एका कर्मचारी तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास तालुका कार्यालय परिसरात फिर्यादी व आरोपी यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपीने जिवे मारायची धमकी दिली अशी फिर्याद पोलीस स्टेशनमध्ये केली आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११५(२), ३५२, ३५१(२) तसेच १६३(२) अन्वये अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत

परळीतून सिगारेट बॉक्स चोरणारा पुण्यातून जेरबंद स्थानिक गुन्हे शाखेकडून २ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातून सिगारेटचे बॉक्स चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील एका आरोपीच्या स्थानिक गुन्हे शाखा, बीडच्या पथकाने पुण्यातून मुसक्या आवळल्या आहेत. त्याच्याकडून चोरीस गेलेला २ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

या कारवाईबाबत सविस्तर वृत्त असे की, परळी शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) आणि ३(५) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा आणि परळी शहर पोलीस करत होते. तपासादरम्यान पोलीस पथकाने घटनास्थळाला भेट देऊन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, हा गुन्हा पुण्यातील विक्रम भवणसिंग राजपूत (वय २७ वर्षे, रा. विद्यानगर, चिंचवड, पुणे) आणि सागर राजू घोडके (रा. पुणे) यांनी मिळून केल्याचे निष्पन्न झाले. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी पुण्यात धाड टाकून विक्रम राजपूत याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून गुन्ह्यात चोरीला गेलेले अंदाजे २ लाख ४० हजार रुपये किमतीचे सिगारेट पाकिटांचे बॉक्स हस्तगत करण्यात आले. आरोपीला मुद्देमालासह पुढील कारवाईसाठी परळी शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, त्याचा दुसरा साथीदार सागर घोडके सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. ही धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई) श्रीमती चेतना तिडके आणि सहायक पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस अंमलदार मारूती कांबळे, रामचंद्र केकाण, विष्णु सानप, गोविंद भताने, सचिन अधिके, चालक अतुल हराळे आणि अधीनुमार सुरवसे यांनी ही कामगिरी यशस्वी केली.

पान १ वरून...

केवायसी, वारस नोंदींच्या अडचणी असल्या

पूर्ण होत आहे, तसतशा नव्या याद्या तयार केल्या जात आहेत. काही जिल्ह्यांमध्ये तब्बल १० ते १५ हजार कुटुंबांना केवायसीसंदर्भात अडचणी येत असल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः ज्या शेतकऱ्यांचे आई-वडील मयत झाले आहेत आणि त्यांच्या नावावर बँक खाते किंवा पीक कर्जाची नोंद आहे, अशा कुटुंबांना वारस नोंदी आणि बँक खात्याच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करताना अडथळे येत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये कर्जदार शेतकऱ्यांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या वारसांना कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी लागत आहे. आई-वडिलांच्या नावावरील बँक खाते मुलांच्या नावावर वर्ग करणे, वारसांची नोंद निश्चित करणे आणि त्यानंतर केवायसी पूर्ण करणे अशा टप्प्यांतून जावे लागत आहे. त्यामुळे संबंधित शेतकरी कुटुंबांना कर्जमाफी मिळण्यास विलंब होत आहे. या अडचणी सोडविण्यासाठी शासनाच्या स्तरावर प्रयत्न सुरू असून, तांत्रिक अडथळे दूर करण्याचे काम केले जात असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

दोनपेक्षा जास्त अपत्यांवर दंडाचे

ठेवली होती. या कायद्यानुसार दोनपेक्षा जास्त अपत्ये असलेल्या उमेदवारांना स्थानिक निवडणुका लढवण्यास अपात्र ठरवण्यात आले होते. वृत्तानुसार, काकोडा ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच मंगला भीमराव यांच्याविरोधात अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल झाली होती. अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना अपात्र ठरवण्याचा आदेश दिला. त्यांनी अतिरिक्त आयुक्तांकडे अपील केले, परंतु ते फेटाळण्यात आले. या निर्णयाला त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. ५ ऑगस्ट २०२५ रोजी उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, याचिकाकर्त्याने आपल्या तिसऱ्या अपत्याच्या जन्म दाखल्याशी आपला संबंध नसल्याचे दर्शवण्याचा प्रयत्न केला होता; परंतु त्या दस्तऐवजात दोन्ही पालकांची नावे नमूद केली होती. त्यामुळे तो दस्तऐवज नाकारता येणार नाही. याउलट कोणतीही साक्ष किंवा पुरावा उपलब्ध नसल्यामुळे उच्च न्यायालयाने त्यांची अपात्रता कायम ठेवली. या आदेशाच्या विरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात 'विशेष अनुमती याचिका' दाखल केली होती. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या संबंधित निर्णयाच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली होती. खंडपीठाने नमूद केले की, २००३ मध्ये जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने 'जावेद विरुद्ध हरियाणा राज्य' प्रकरणात 'दोन अपत्यांच्या धोरणा'ची घटनात्मक वैधता कायम ठेवली होती, तेव्हा भारताचा एकूण प्रजनन दर ३ होता; जो आता १.९ वर आला आहे. न्यायालयाच्या निरीक्षणांनुसार, प्रजनन दरातील ही घट, जी आता २.१ च्या 'रिप्लेसमेंट लेव्हल' (लोकसंख्या स्थिर राखण्यासाठी आवश्यक दर) पेक्षाही खाली गेली आहे, ती लवकरच अशा लोकसंख्याशास्त्रीय बदलाकडे नेईल, ज्यामध्ये लोकसंख्या वृद्ध होत जाईल आणि कार्यक्षम वयोगटातील (काम करणाऱ्या वयातील) लोकांचे प्रमाण कमी होत जाईल.

सिल्क साड्यांना बाजारपेठ

मिळणे आवश्यक आहे. या साड्यांना योग्य बाजारपेठ उपलब्ध झाल्यास स्थानिक विणकर महिलांच्या उत्पादनाला चांगला दर मिळेल आणि त्यांच्या कष्टाचे योग्य मूल्य मिळण्यास मदत होईल. यासाठी शासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले. रेशीम उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे महिलांना केवळ प्रशिक्षण देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करता यावा, यासाठीही प्रयत्न करण्यात येतील. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना शासकीय योजनांच्या माध्यमातून अनुदान तत्त्वावर आवश्यक साधने व सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. यामुळे महिलांना स्वतःच्या कौशल्याचा उपयोग करून आर्थिक उत्पन्न मिळविता येईल आणि त्यांना स्वावलंबी होण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, प्रादेशिक रेशीम कार्यालयाचे उपसंचालक महेंद्र ढवळे, माजी रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते, रेशीम विकास विभागाच्या अधिकारी निर्मला उगले, उपप्रादेशिक अधिकारी सिंधू कापरे, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख एस. व्ही. सोनवणे प्राध्यापक अजय मिटकरी, प्राध्यापक पंडित वासरे, प्राध्यापक संगीता कराळे, कृषिरत्न विजयाना बोराडे, कृषी भूषण भगवानराव काळे संबंधित विभागांचे अधिकारी, गणेश सिल्क इंडस्ट्रीजचे प्रतिनिधी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच वरुडी गावचे सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी रेशीम उद्योगाचा विस्तार, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

यापुढचे निर्णय कोअर

यांनी मौन बाळगल्याचे दिसून आले. पार्थ पवार यांच्या आदेशाने अलीकडेच राष्ट्रवादीच्या मुंबई अध्यक्षपदी झिशान सिद्दीकी आणि राष्ट्रीय प्रवक्तेपदी उमेश पाटील यांची नियुक्ती केली होती. या नियुक्त्या करताना कोअर कमिटीला विचारात न घेतल्याने राष्ट्रवादीतील वरिष्ठ नेत्यांचा गट नाराज झाला होता. त्यामुळे या नियुक्त्यांबाबत फेरविचाराची शक्यता वर्तविली जात होती. मात्र, आजच्या बैठकीत पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार यांच्याकडून करण्यात आलेल्या नियुक्त्या कायम राहतील, हे स्पष्ट झाले. मुंबई अध्यक्ष म्हणून झिशान सिद्धकी आणि मुख्य प्रवक्ते उमेश पाटील पुढील सहा महिने काम करतील. सहा महिन्यातील काम पाहून नंतर निर्णय घेऊ, अशी भूमिका पार्थ पवार यांनी बैठकीत मांडली. तसेच, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्या पदांबाबतचा संभ्रम अद्यापही कायम असल्याची माहिती आहे.

विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात

शासकीय नामनिर्देशित संचालक नियुक्त करण्यासही मान्यता देण्यात आली. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या ओबीसी, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. वाढत्या महागाईमुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन खर्चाचा प्रश्न निर्माण होत असल्याने निर्वाह भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. विभागस्तरीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आता दरमहा १ हजार ५०० रुपये, तर जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना १ हजार ३०० रुपये निर्वाह भत्ता मिळेल. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे वाहनांवर आकारण्यात आलेला प्रलंबित दंड भरण्यासाठी 'महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलन अभय योजना-२०२६' लागू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्रलंबित ई-चलन दंडाच्या रकमेत एकवेळची बाब म्हणून २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून दंडाची थकबाकी असलेल्या वाहनधारकांना सवलतीचा लाभ घेऊन दंडाची रक्कम भरता येणार आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयांमध्ये सेवा देण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, हा यामागील उद्देश आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी आणि पशुपालकांना पशुधनाच्या उपचारासाठी अधिक मदत उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय राज्यातील वार्षिक ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांच्या समित्यांवर शासनाकडून पाच सदस्यांची नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली. यामध्ये सहाय्यक निबंधक दर्जापेक्षा कमी नसलेला एक शासकीय अधिकारी आणि सहकारी संस्थांच्या कामकाजाचा अनुभव असलेल्या चार व्यक्तींचा समावेश असेल. शासकीय अधिकाऱ्याला मतदानाचा अधिकार नसेल, तर अन्य चार सदस्यांना संचालक मंडळात मतदानाचा अधिकार असेल. मात्र, त्यांना संस्थेच्या पदाधिकारीपदाच्या निवडणुकीत सहभागी होता येणार नाही. ही सुधारणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना लागू राहणार नाही. यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ अअअ (२) मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

फटाके फोडण्यासाठी वेळेच्या

महाराष्ट्रात लागू करता येतील का, याचा विचार करावा, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला दिले आहेत. अभिनेत्री दिया मिर्झा यांचा दिवाळीनिमित्तचा एक व्हिडिओ बृहन्मुंबई महानगरपालिकेने हटवल्याची दखल घेत, उच्च न्यायालयाने स्वतःहून या प्रकरणाची नोंद घेतली. त्यानंतर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने १३ पानांचा आदेश जारी केला. या आदेशात, सणासुदीच्या काळात दिल्ली-एनसीआर क्षेत्रात वाढलेल्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने २९ ऑक्टोबर रोजी दिलेल्या काही निर्देशांचा संदर्भ देण्यात आला आहे. या आदेशात उच्च न्यायालयाने म्हटले की, राज्य सरकार आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बीएमसी व पोलीस विभाग यांसारख्या संबंधित प्राधिकरणांनी या निर्देशांचा, विशेषतः फटाके फोडण्याच्या वेळेबाबतच्या नियमांचा विचार करणे योग्य ठरेल. सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात दिवाळीदरम्यान केवळ पर्यावरणपूरक फटाके फोडण्याची परवानगी दिली असून, त्यासाठी सकाळी ६ ते ७ आणि रात्री ८ ते १० अशा ठराविक वेळा निश्चित केल्या आहेत. आमच्या मते, स्थानिक परिस्थितीचा विचार करता, राज्य सरकार आणि महाराष्ट्रातील संबंधित प्राधिकरणांनी या निर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबत विचार करणे योग्य ठरेल. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले होते की, दिवाळी हा एक आनंदाचा राष्ट्रीय सण असला आणि तो सर्व समुदायांकडून उत्साहात साजरा केला जात असला, तरी अनियंत्रितपणे फटाके फोडल्यामुळे पर्यावरणाला आणि आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. यामुळे हवेच्या गुणवत्तेच्या निर्देशांकात अचानक मोठी वाढ होऊ शकते, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते.

अग्निवीरांना दिवाळीची मोठी भेट;

अभिप्राय मिळाले आहेत. त्यामुळे अग्निवीरांच्या भवितव्याचा विचार करून सुधारित योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. गुणवत्तेच्या आधारावर २५ टक्के अग्निवीरांना नियमित सैन्यात समाविष्ट केले जाईल. तर उर्वरित ७५ टक्के अग्निवीरांना दोन वर्षांची अतिरिक्त सेवा मुदतवाढ दिली जाईल. या कालावधीत त्यांच्या कामगिरीचे सातत्याने मूल्यमापन केले जाणार असून, त्यांना वाढीव वेतन आणि भत्त्यांचाही लाभ मिळणार आहे. दोन वर्षांचा अतिरिक्त कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर नियमित सेवेत जाण्यास इच्छुक असलेल्या अग्निवीरांचा निश्चित निवड प्रक्रियेद्वारे विचार केला जाणार आहे. त्यामुळे चार वर्षांनंतर सेवेतून बाहेर पडण्याची शक्यता असलेल्या अग्निवीरांना आता नियमित सैन्यात दाखल होण्यासाठी आणखी एक संधी उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, सुमारे १८ हजार अग्निवीरांना आगामी काही आठवड्यांत चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर सेवेतून मुक्त केले जाण्याची शक्यता होती. मात्र, मंत्रिमंडळाच्या नव्या निर्णयामुळे या जवानांना दोन वर्षांची अतिरिक्त सेवा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अग्निपथ योजनेच्या अंमलबजावणीनंतर अग्निवीरांच्या सेवाकाळाबाबत आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींबाबत सातत्याने चर्चा होत होती. अशा परिस्थितीत केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे अग्निवीरांना नियमित सैन्यात कायम होण्याची संधी वाढणार असून, संरक्षण दलांतील मनुष्यबळाच्या नियोजनालाही नवे स्वरूप मिळण्याची शक्यता आहे.

जाहीर प्रगटन

मा. के. सी. माने ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

बीड, ता.जि. बीड

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १००१/२०२६ .

CNR.No. MHBI0200018042026

पार्वती फुलचंद व ईतर वि. निरंक

(मार्फत अॅड. यु. ए. काचमांडे)

अर्जदार : १. पार्वती भ्र.फुलचंद जाधव, (पार्वती पि. नारायण मुळे-माहेरकडील नाव) वय-६० वर्षे, धंदा-घरकाम, रा. कर्झणी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात धोंडाबाई नारायण मुळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत धोंडाबाई नारायण मुळे यांचा मृत्यु दिनांक २३/१२/२०२५ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत धोंडाबाई नारायण मुळे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख १७/११/२०२६

आज दिनांक ०७ माहे जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित — स्वाक्षरित

क. लिपीक — **अधिक्षक**

दिवाणी न्यायालय व स्तर बीड

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. ०५ नोव्हेंबर २०२६
३

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा दिलासा

शिव गोरक्ष आश्रम ट्रस्टकडून प्रत्येकी २५ हजारांचे वाटप; वारसांना स्वयंरोजगारासाठीही प्रशासनाचे पाठबळ

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि नापिकीमुळे हतबल होऊन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक व सामाजिक आधार देण्यासाठी प्रशासनाने विशेष पुढाकार घेतला आहे. यात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पाठपुरावा आणि प्रयत्नांना यश आले असून, पुणे येथील श्री शिव गोरक्ष आश्रम ट्रस्ट (आंबेगाव बु.) यांच्या वतीने जिल्ह्यातील २५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील वारसांना प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत या धनादेशांचे वाटप करण्यात आले. ट्रस्टचे अध्यक्ष किशोर मंडलिक, राजेंद्र अडगळे आणि राजेंद्र दीक्षित यांच्या सौजन्याने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मदतीसाठी केज, माजलगाव, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, धारूर, गेवराई, बीड, शिरूर कासार आणि वडवणी या तालुक्यातील २५ कुटुंबांची प्रशासनाकडून निवड करण्यात आली होती.

या कार्यक्रमात प्रशासनाने केवळ धनादेशांचे वाटप करून औपचारिकता पूर्ण केली नाही, तर उपस्थित प्रत्येक महिला व



वारसांशी अत्यंत संवेदनशीलपणे थेट संवाद साधला. या कुटुंबांना केवळ तात्पुरती आर्थिक मदत न देता, त्यांना कायमस्वरूपी स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी अधिकाऱ्यांनी सविस्तर चाचपणी केली.

कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी अधिकाऱ्यांनी महिलांना त्यांच्या कौशल्यांबद्दल विचारणा केली. ज्या महिलांना शिवणकाम येते, त्यांना शिलाई मशीन उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच, शेळीपालनाची इच्छा असणाऱ्या महिलांना प्रशिक्षण देऊन शासनामार्फत शेळ्या उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी मुलांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळवून देण्याबाबत अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. एका कुटुंबातील आजारी व अंथरुणाला खिळलेल्या वृद्ध सदस्यासाठी तातडीने वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

या सर्व महिलांना संजय गांधी निराधार योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना आणि रेशनचे धान्य नियमित मिळत आहे की नाही, याची अधिकाऱ्यांनी वैयक्तिक पातळीवर खात्री करून घेतली व त्यात येणाऱ्या अडचणी सोडवण्याचे आश्वासन दिले.

सध्या जिल्ह्यात दुष्काळाचे मोठे सावट असल्याने, या परिस्थितीत लग्नसमारंभांवर अवाढव्य खर्च करून कुटुंबांनी पुन्हा कर्जबाजारी होऊ नये, असा मोलाचा सल्ला प्रशासनाने दिला. ज्या कुटुंबांमध्ये उपवर मुले-मुली आहेत, त्यांनी शासनाच्या सामूहिक विवाह योजनेचा लाभ घ्यावा. या योजनेत सहभागी झाल्यास शासनाकडून २० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते, ज्यामुळे लग्नाचा संपूर्ण खर्च वाचतो. येत्या २४-२५ तारखेला आणि त्यानंतर डिसेंबर महिन्यातही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सामूहिक विवाह सोहळे आयोजित केले जाणार असून, कुटुंबांनी पैशांची बचत करून समाजकल्याण अधिकाऱ्यांकडे यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

थोडक्यात



श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात गरजु विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ वाटप

माजलगाव (प्रतिनिधी) भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अमृत महोत्सवी वर्ष व श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे हिरक महोत्सवी वर्षानिमित्त विस्तार सेवा विभागांतर्गत श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात गरजु होतकरू, एकल पालक विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

निवृत्तीवेतनधारकांनी हयातनामा संकेतस्थळ व मोबाईल ॲपद्वारे सादर करावेत

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतनधारकांनी दि. १ ते ३० नोव्हेंबर २०२६ दरम्यान आपला हयातीचा दाखला सादर करणे शासनाकडून बंधनकारक करण्यात आले आहे. मुदतीत दाखला सादर न केल्यास डिसेंबर २०२६ पासून निवृत्ती वेतन अदा केले जाणार नाही, तरी बँकांमधील गर्दी टाळण्यासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या जीवन प्रमाण संकेतस्थळ व मोबाईल पचा जास्तीत जास्त वापर करून ऑनलाईन पद्धतीनेच आपले हयातीचे प्रमाणपत्र कोषागारात सादर करावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी केले आहे. निवृत्तीवेतनधारकांना आपला हयातीचा दाखला सादर करण्यासाठी शासनाने प्रत्यक्ष आणि ऑनलाईन अशा दोन्ही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. निवृत्तीवेतनधारकांनी संबंधित बँकेत प्रत्यक्ष उपस्थित राहून यादीतील आपल्या नावासमोर स्वाक्षरी करावी किंवा अंगठ्याचा ठसा उमटवावा. तसेच चालू मोबाईल क्रमांक, पुनर्विवाह किंवा पुनर्नियुक्ती झाली असल्यास त्याची माहिती नोंदवावी. क्षशर्शीरपारिरारप.सॉ.ळप या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन किंवा स्मार्टफोनवर जीवन प्रमाण प्लिकेशन डाउनलोड करून चेहरा किंवा बोटांच्या ठशांद्वारे ऑनलाईन ओळख पटवून दाखला सादर करता येईल. हयातीच्या प्रमाणपत्रावर बँक अधिकारी किंवा कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याच्या समक्ष स्वाक्षरी घेऊन ते प्रमाणपत्र जिल्हा कोषागार कार्यालयात जमा करता येईल. भारतीय डाक विभागाने डिजिटल हयातीचा दाखला ऑनलाईन सादर करण्याची सशुल्क सुविधा उपलब्ध करून दिली आहे. काही कारणास्तव परदेशात असलेल्या निवृत्तीवेतनधारकांना तेथील भारतीय राजदूतावासाच्या माध्यमातून आपला हयातीचा दाखला संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयाकडे पाठविता येईल. वेळेत दाखला सादर न केल्यास निवृत्तीवेन थांबवले जाईल, याची सर्व लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी. असेही कळविले आहे.



मोठेवाडीत मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न; १२० रुग्णांची तपासणी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथे चंपवती नेत्रालय, बीड आणि ग्रामपंचायत कार्यालय, मोठेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, ४ नोव्हेंबर रोजी मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात पार पडले.या शिबिरात प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. नारायण आळणे यांच्या मार्गदर्शनाखाली. डॉ. नावेद शेख,डॉ.अशोक धरपडे,,डॉ.चंद्रशेन चौरे यांनी मोठेवाडी येथील १२० रुग्णांची डोळ्यांची तपासणी केली. ग्रामीण भागातील नागरिकांना गावातच दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी आयोजित केलेल्या या शिबिराला ग्रामस्थांचा व रुग्णांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

वडवणी तालुक्यातील ग्रामीण गुणवत्तेची अंतराळभरारी! तीन विद्यार्थ्यांची नासा-इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड

वडवणी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थीही आपल्या बुध्दीमत्तेच्या आणि जिद्दीच्या जोरावर मोठी भरारी घेवूच शकतात, हे वडवणी तालुक्यातील तीन गुणवंत विद्यार्थ्यांनी सिध्द करुन दाखवले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळटक्का येथील इयत्ता आठवीचे विद्यार्थी चि.श्रेयस दादाभाऊ कदम व कु.श्रावणी हनुमंत कदम, तसेच जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा देवळा येथील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी कु.संस्कृती सुनिल कदम या तिन्ही विद्यार्थ्यांची यंदाच्या प्रतिष्ठित नासा व इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे. या यशामुळे संपूर्ण वडवणी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या तिन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची चमक दाखवत सर्वप्रथम केंद्रस्तरीय परीक्षा यशस्वीरीत्या पार केली. त्यानंतर तालुकास्तरावरील परीक्षेतही उल्लेखनीय कामगिरी केली आणि आता जिल्हास्तरावरील परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन करत नासा व इस्त्रो या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या अंतराळ संशोधन संस्थांच्या शैक्षणिक सहलीसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही निवड म्हणजे प्रेरणादायी आणि कौतुकास्पद कामगिरी ठरली आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, जिद्द, अभ्यासातील सातत्य



आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यांचा मोठा वाटा आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळटक्का येथील मुख्याध्यापक श्रीकृष्ण उंडाळे सर, बंडू मुंडे सर, वैभव धावडे सर, रणजीत घोरड सर, भीमा राठोड सर यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा देवळा येथील मुख्याध्यापक पांढरे सर, मार्गदर्शक निलेश चव्हाण सर, वर्गशिक्षक नाटकर सर यांच्यासह इतर गुरुजनांनीही विद्यार्थ्यांच्या यशासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबध्दल वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी अशोक बाराखोते, कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांच्यासह सर्व केंद्रप्रमुख, केंद्रिय मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांनी तिन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील शैक्षणिक सहलीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वातून ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. थेट सातासमुद्रापार असलेल्या अमेरिकेच्या नासा आणि भारतातील श्रीहरी कोटा येथील इस्त्रोसारख्या जागतिक स्तरावरील अंतराळ संशोधन संस्थांना भेट देण्याची संधी मिळणे ही त्यांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय पर्वणी ठरणार आहे. या सहलीतून त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि नव्या वैज्ञानिक संकल्पना प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पिंपळटक्का व देवळा गावासह संपूर्ण वडवणी तालुक्याची मान उंचावली असून, त्यांच्या या यशाने इतर विद्यार्थ्यांनाही मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली आहे. या तिन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांचे पालक, मार्गदर्शक शिक्षक आणि संबंधित शाळांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

नीती आयोगाच्या 'आकांक्षित' कार्यक्रमांतर्गत बीडमध्ये 'आकांक्षा हाट'चे उद्घाटन

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

नीती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमांतर्गत बीड जिल्हा परिषद आवारात 'आकांक्षा हाट' (वोलक फॉर लोकल) या दोन दिवसीय विक्री प्रदर्शनाचे आणि महोत्सवाचे दिमाखात उद्घाटन झाले. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

उद्घाटन समयी आपल्या मनोगतात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी, जिल्ह्यातील शेतकरी आणि महिला स्वयंसहाय्यता गटांनी शासकीय योजनांचा लाभ घेत विविध उद्योगांच्या माध्यमातून आपले आर्थिक जीवनमान उंचावण्याचे आवाहन केले. ''दुष्काळ असो वा कोणतेही मोठे संकट, जेव्हा नारीशक्ती एकत्रित उभी राहते, तेव्हा विजय निश्चित असतो,'' असा प्रेरणादायी संदेश त्यांनी यावेळी दिला.

या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक विलास जाधव, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, गटविकास अधिकारी अशोक बाराखोते वडवणी, जिल्हा व्यवस्थापक आशा पवार, जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी राजेश्वर कदम, जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती शीला मिसाळ, कृषी विकास अधिकारी साहिल सय्यद यांच्यासह



विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, शेतकरी, ग्रामसखी, महिला स्वयंसहाय्यता गटातील सदस्य, आशा व अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी कार्यक्रमात बोलताना महिला गटांच्या उत्पादनांचे भरभरून कौतुक केले. 'उमेद' (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोमी अभियान) अंतर्गत स्थापित तसेच विविध विभागांतील गरजू महिला स्वयंसहाय्यता गटांनी तयार केलेल्या दिवाळी फराळाची व विविध वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचे आवाहन त्यांनी बीडकरांना केले. तसेच उत्पादनांचा दर्जा वाढवून ती राष्ट्रीय स्तरापर्यंत कशी पोहोचवावी, याबाबत मार्गदर्शन केले. या दोन दिवसीय (४ व ५ नोव्हेंबर २०२६) प्रदर्शनात ग्रामीण भागातील विविध विभागांचे तब्बल ३० स्टॉल उभारण्यात आले आहेत. यामध्ये शासकीय माहिती, प्रात्यक्षिके आणि दिवाळी फराळ/साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय, दुष्काळ परिस्थितीमध्ये फळबागांची काळजी कशी घ्यावी आणि पाण्याचे नियोजन कसे करावे, याविषयी मार्फत शेतकऱ्यांना मोफत २५०० पुस्तकांचे वाटप करण्यात आले. बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन महिला व शेतकऱ्यांच्या उत्पादनांची खरेदी करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. सर्व विभागप्रमुखांच्या विशेष सहकार्यामुळे हा कार्यक्रम ग्रामीण महिलांना रोजगार व उद्योग निर्मितीसाठी मोठी मदत ठरणार आहे.

पाणीटंचाई निवारणासाठी प्रशासनाची तयारी

बीड । प्रतिनिधी

एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पर्जन्यमानात घट होऊन आगामी काळात ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता बीड जिल्हा प्रशासनाने पाणीटंचाई निवारणाच्या उपाययोजनांच्या नियोजनाला प्राधान्य दिले आहे. संभाव्य टंचाईवर वेळीच मात करण्यासाठी शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने ६ ऑक्टोबर २०२६ रोजी त्रिस्तरीय समित्यांच्या माध्यमातून नियमित आढावा घेण्याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानुसार महसूल विभागस्तर, जिल्हास्तर आणि तालुकास्तरावर समन्वयातून उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाई, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि आवश्यक उपाययोजनांच्या नियोजनावर विशेष लक्ष आहे. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडूनही महसूल यंत्रणेतील समन्वय आणि कामकाजाच्या आढाव्याला महत्त्व दिले जात आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीतीन रहेमान यांच्यासह पाणीपुरवठा, भूजल, जलसंपदा आणि मृद व जलसंधारण विभागाच्या यंत्रणांची भूमिका या प्रक्रियेत महत्त्वाची राहणार आहे.

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शासन निर्णयातील तरतुदी आणि पाणीटंचाई निवारणाच्या नियोजनाबाबत माहिती देताना सांगितले की, संभाव्य टंचाईचा विचार करून गावनिहाय आणि वाडीनिहाय कृती आराखडा तयार करणे, त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि नागरिकांना प्रत्यक्ष पाणी उपलब्ध होत आहे की नाही, याची खातरजमा करणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हा आणि तालुकास्तरावरील सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे.

पाणीटंचाईच्या नियोजनासह परळीच्या विविध विकासकामांना न. प.च्या सर्वसाधारण सभेत दिशा !

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

ना. पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा उद्देश घेऊन नगरपरिषद काम करत आहे. आगामी काळात उद्भवू शकणारी पाणीटंचाई, शहरातील पायाभूत सुविधांचा विकास आणि नागरी प्रश्नांच्या निराकरणावर लक्ष केंद्रित करीत परळी वैजनाथ नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नगर परिषद सभागृहात अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात झालेल्या या सभेत पाणीटंचाई निवारण आराखडा, रस्ते विकास, घनकचरा व्यवस्थापन, पथविक्रेत्यांचे नियोजन आणि निवासी अतिक्रमणांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दुष्काळी परिस्थितीचा विचार करून संभाव्य पाणीटंचाई व अन्य बाबींसाठी स्वतंत्र टंचाई आराखडा तयार करण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला. सुधारित निकषांनुसार जिल्हा नियोजन समितीकडे आवश्यक प्रस्ताव सादर करण्याबाबत चर्चा झाली. पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाबरोबरच शहरातील विकासकामे सुरू ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर भर देण्यात आला. शहरातील प्रस्तावित रस्त्यांसाठी बाधित होणाऱ्या जागांची मोजणी करून संबंधित शेतकऱ्यांना नियमानुसार विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) देण्याची कार्यवाही करण्याचे निश्चित करण्यात आले. तहसील कार्यालयामागील सर्व्हे क्रमांक २० आणि २१ मधील प्रस्तावित ३० मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचाही निर्णय झाला.

कचऱ्यापासून इंधननिर्मितीचा प्रस्ताव

घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने २५ टन प्रतिदिन क्षमतेचा आधुनिक व्हॅक्यूम डिहायड्रेटेड प्रोसेस सिस्टीम प्रकल्प उभारण्याबाबत



सभेत निर्णय घेण्यात आला. शहरातून संकलित होणाऱ्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून त्यापासून इंधन म्हणून वापरता येणाऱ्या पॅलेट्सची निर्मिती करण्याची या प्रकल्पामागील संकल्पना आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी झाल्यास कचरा व्यवस्थापनासोबतच त्याचा पुनर्वापर करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.

पथविक्रेता आराखड्याबाबत निर्णय

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत 'पालिका तेथे मत्स्यबाजार' ही संकल्पना राबविण्यासाठी आराखडा तयार करण्यावर चर्चा झाली. स्थानिक मत्स्यव्यावसायिकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा त्यामागील उद्देश आहे. शहरातील पथविक्रेत्यांच्या व्यवस्थापनासाठी तयार केलेल्या आराखड्याला मान्यता देण्याबाबतही निर्णय घेण्यात आला.

निवासी अतिक्रमणांच्या नियमनासाठी चर्चा

१ जानेवारी २०११ पूर्वीची शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे शासनाच्या प्रचलित नियमांनुसार नियमानुकूल करण्याच्या प्रक्रियेसाठी विधिज्ञ सल्लागार नियुक्त करण्याचे ठरले. नगर परिषदेच्या मालकीच्या जागेवर व्यवसाय करणाऱ्या भाजीपाला आडत व्यावसायिकांनी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून आवश्यक परवाने घेण्याबाबतही चर्चा झाली. तसेच अग्निशमन विभागाच्या जुन्या वाहनावर १२ हजार लिटर क्षमतेचा पाण्याचा टँकर बसविणे, नगर परिषदेच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग शेड उभारणे आणि पाणीटंचाई व दुष्काळजन्य परिस्थितीमुळे अडचणी येणाऱ्या विकासकामांना आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्याचे प्रस्तावही सभेत संमत करण्यात आले.

गौरव: नगराध्यक्षांच्या निवडीबद्दल अभिनंदन ठराव

दरम्यान, नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (-खखडडऋ) यांच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सभागृहाच्या वतीने अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरील संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात सर्वसाधारण सभा

विषय सूचीप्रमाणे साधक बाधक चर्चा व शहर विकासाच्या दृष्टीने केंद्रित मुद्द्यांवर चर्चा करत अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात ही सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत न.प.ची वाटचाल व शहर विकासाचा दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत ठराव सर्वानुमते सभागृहात मंजूर करण्यात आले.या सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी भूषवले. यावेळी उपनगराध्यक्ष खैसर राजा खान पठाण, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांची पीठासनावर प्रमुख उपस्थिती होती. या सभेला सर्व सन्माननीय सभापती, न. प. सदस्य, सदस्या उपस्थित होते.

पान ६ वरून...

दुष्काळी परिस्थितीत एकनाथ

पाऊस यांची पर्वा न करता हे कामगार रात्रंदिवस कष्ट करतात. त्यांच्या घामातून साखर उद्योगाला चालना मिळते. मात्र या कामगारांच्या कुटुंबांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा कष्टकरी बांधवांच्या आयुष्यात सणासुदीच्या काळात आनंदाचे काही क्षण निर्माण व्हावेत हीच या शिधा वाटपामागची या भावनेतून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भावना आहे असे शिंदे म्हणाले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की, बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांचे राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान आहे. मात्र दिवाळीसारख्या सणाच्या काळातही अनेक कामगार आपल्या कुटुंबापासून दूर राहून काम करत असतात. अशा कामगारांना दिवाळीतील आनंदाचा वाटा उचलता यावा या उद्देशाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने शिधा वाटपाचा उपक्रम घेण्यात आला. शिवसेना ही नेहमीच कष्टकरी आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणारी संघटना राहिली आहे. यापुढेही ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांसाठी शिवसेना ताकदीने त्यांच्या पाठीशी उभी राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमासाठी यावेळी उपस्थित , परमेश्वर कराड , चंद्रकांत नवले ,, हनुमंत काका मोरे व्हाईस चेअरमन गंगा माऊली शुगर , विजयप्रकाश ठोंबरे ,योगेश नवले ,सुरवसे साहेब , पृथ्वीराज पाटील , दादासाहेब ससाणे शिवसेना , अविनाश आदनाक ,दत्तकुमार काकडे ,राजाभाऊ लोमटे, अर्जुन वाघमारे , सय्यद माजेद ,सपाटे साहेब ,प्रकाश गुंड ,आदित्य रांजणकर , महेंद्र चाटे , पृथ्वीराज इंगळे , सय्यद पाशा, विश्वासराव जाधव , दादासाहेब पटाईत ,शिवाजी गायकवाड , प्रकाश रोमन , रामहरी कोल्हे , हनुमंत हावळे ,महादेव चाटे ,दशरथ चाटे, शिवशंकर पाटील, नाईकनवरे ,अमर माने, हरिभाऊ चाटे, रवी मुडेगावकर ,सुनिता जाधव ,आम्रपालीताई गजेशीव, बालासाहेब पवार, अंगद वाघमारे , प्रथमेश खोमणे ,सतीश पटाईत ,मनोज गोंड, सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी शिवसेनिक व मोठ्या प्रमाणावर ऊसतोड कामगार हजर होते

परळीच्या जनता दरबारात

प्रतिसादामुळे चिमुकल्याच्या चेहऱ्यावर आनंद खुलला.

सार्वजनिक जीवनातील व्यस्त कामकाज आणि नागरिकांच्या प्रश्नांची गर्दी असतानाही एका लहान मुलाशी संवाद साधण्यासाठी वेळ देण्याच्या या कृतीतून पंकजाताईंची संवेदनशील बाजू दिसून आली. जनतेच्या तक्रारी आणि मागण्यांच्या चर्चेने व्यापलेल्या जनता दरबारात या छोट्याशा प्रसंगाने वेगळेच भावनिक चित्र निर्माण केले. आधी रडणारा चिमुकला, ताईंसमोर येताच त्याने केलेला नमस्कार आणि त्यानंतर झालेला संवाद, चॉकलेटची छोटीशी भेट... या प्रसंगाने उपस्थितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले. मोठ्या राजकीय घडामोडींपेक्षा कधी कधी अशा साध्या मानवी क्षणांतूनही सार्वजनिक जीवनातील संवेदनशीलतेचे दर्शन घडते, याची प्रचिती या प्रसंगातून आली.

मुख्यमंत्री सहायता निधीतून

नयेत आणि गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत, या उद्देशाने आ.सुरेश धस सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा करत आहेत.सामान्य कुटुंबातील रुग्णांना संकटाच्या काळात आर्थिक आधार मिळवून देण्याच्या या प्रयत्नांमुळे संबंधित रुग्णांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या अडचणींच्या काळात मदतीसाठी धावून जाण्याच्या भूमिकेचे परिसरातून स्वागत होत आहे. या रुग्णाला आमदार सुरेश धस यांच्या ऑफिसमधून अमर वाळके, विकास साळवे, शरद रेडेकर,दत्ता हूले,विनोद वाघ या रुग्ण सेवकांनी मदत केली

पतसंस्था आणि पोलीस

व कर्मचाऱ्यांना काही अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी पोलीस प्रशासनाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्यास हे प्रश्न अधिक सुलभतेने सोडविण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कर्जवसुलीच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या तक्रारी व वादांमध्ये दोन्ही बाजूंची वस्तुस्थिती समजून घेऊन कायद्याच्या चौकटीत निष्पक्ष कार्यवाही व्हावी. पतसंस्थांचे कामकाज सुरळीत चालावे, कर्मचाऱ्यांना निर्भयपणे काम करता यावे आणि ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण व्हावे, यासाठी पोलीस प्रशासन व पतसंस्था फेडरेशन यांच्यात सातत्यपूर्ण संवाद आणि समन्वय राहावा, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली.

पोलीस प्रशासन आणि सहकार क्षेत्र यांच्यातील परस्पर सहकार्यामुळे जिल्ह्यातील पतसंस्था क्षेत्रातील प्रश्न सकारात्मक पद्धतीने मार्गी लागतील, असा विश्वास फेडरेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला. यावेळी फेडरेशनचे उपाध्यक्ष ड प्रकाश कवठेकर, संचालक शिवाजी देसाई, अर्जुन राऊत, संतोष सपकाळ, राहुल शिंदे,अशोक राऊत,सखाराम राऊत, चक्रधर कदम, नवनाथ खरसाडे, अंतराम गात, सखाराम शिंदे, रमेश मदने,संजय घरत, अशोक उगले,राजेंद्र ढोले,अजय धांडे,गौरीशंकर धर्माधिकारी,मुकुंद रनखांबे,सुनिल चव्हाण, मुकेश भांडवलकर,पांडुरंग घोडके, लक्षदीप पतसंस्था आदी पदाधिकारी उपस्थित होते.

कर्जमुक्ती योजने अंतर्गत

दुसऱ्या व तिसऱ्या यादीतील एकूण २०४,३६६ थकीत पीक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची नावे जाहीर झाली होती, त्यापैकी आतापर्यंत १७५,४२९ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. अद्यापही जिल्ह्यातील २८,९३७ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केलेले नाही. यापैकी तब्बल ११,०८० शेतकऱ्यांकडे 'फार्मर आयडी' ( ) उपलब्ध नाही. ज्या शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण बाकी आहे, त्यांनी तात्काळ आपले आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन मा. जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.

अतिवृष्टी व पूरबाधित शेतकऱ्यांना २९१ कोटी ९१ लाख रुपयांची मदत

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांची माहिती

पुणे / प्रतिनिधी

यंदाच्या वर्षी जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून २९१ कोटी ९१ लाख ४ हजार रुपयांची मदत मंजूर केली आहे. यापैकी शेतीपिकांच्या नुकसानीसाठी २६२ कोटी ६९ लाख ९५ हजार रुपये, तर शेतजमिनीच्या नुकसानीसाठी २९ कोटी २१ लाख ९ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात येणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

पुढे बोलताना मकरंद जाधव पाटील म्हणाले की, मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केले आहेत. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यात येणार आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीबाबत ३ लाख ९ हजार २८९ बाधित शेतकऱ्यांच्या २ लाख ६८ हजार ९१८.२९ हेक्टर क्षेत्रासाठी २६२ कोटी ६९ लाख ९५ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, कोकण आणि नाशिक विभागांतील बाधित शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश आहे. या मदतीचा



लाभ सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर आणि नंदुरबार जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांना होणार आहे. शेतीपिकांच्या नुकसानीची मदत थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे, असेही सांगितले. पुढे बोलताना मकरंद जाधव पाटील म्हणाले की, एका हंगामात एकदाच मदत देण्याच्या निकषाचे पालन करून कोणत्याही लाभार्थ्याला दुबार मदत मिळणार नाही, याची खातरजमा तहसीलदार आणि जिल्हाधिकारी कार्यालय करणार आहे. मकरंद जाधव पाटील म्हणाले की, अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतजमिनीचेही नुकसान झाले होते. राज्यात शेतपिकाचे नुकसान झालेल्या ३४ हजार ९८४ शेतकऱ्यांच्या ७ हजार ६७५.४० हेक्टर क्षेत्रासाठी २९ कोटी २१ लाख ९ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अमरावती, नागपूर, कोकण, नाशिक आणि पुणे विभागांतील यवतमाळ, बुलढाणा, अमरावती, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव, सातारा आणि पुणे जिल्ह्यांतील बाधितांचा यात समावेश आहे. शेवटी बोलताना मकरंद जाधव पाटील म्हणाले की, शेतजमिनीच्या नुकसानीसाठी जमीनमालक असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना विहित दराने जास्तीत जास्त दोन हेक्टरच्या मर्यादेत मदत मिळेल. जमिनीतील वाळू, गाळ किंवा क्षार काढणे तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पात्र नुकसानीसाठी हा निधी वापरण्यात येणार आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मिळणारी मदत बँकांनी कर्ज खात्यात किंवा अन्य वसुलीसाठी वळती करू नये, अशा सूचना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांना द्याव्यात, असेही सांगितले.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८१७ : इंग्रज व दुसरे बाजीराव यांच्या लढाईत इंग्रजांकडून बाजीरावाच्या सैन्याचा पराभव झाला.
१८२४ : अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात जगातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले.
१८४३ : विष्णुदास अमृत भावे स्वरचित सीता स्वयंवर या मराठीतील पहिल्या नाटकाचा पहिला प्रयोग सांगली येथे सदर केला.
१८७२ : महिलांना मतदानाचा अधिकार नसताना अमेरिकेत सुसान अँथनी या महिलेने मतदान केल्यामुळे तिला १०० डॉलर दंड करण्यात आला.
१८९५ : जॉर्ज बी. सेल्डेन यांना ऑटोमोबाइलसाठी पहिले अमेरिकेचे पेटंट भेटले.
१९२९ : जी. आय. पी. रेल्वे कंपनीने मुंबईहून पुण्यापर्यंतच्या लोहमार्गावरून आगगाड्याऐवजी विजेवर चालणा-या गाड्यांचा प्रारंभ केला.
१९४० : फ्रँकलिन डी. रूझवेल्ट हे तिसऱ्यांदा निवडून आलेले. एकमेव राष्ट्रपती आहेत.
१९४५ : कोलंबियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
१९५१ : बी. बी. सी. आय.रेल्वे आणि सौराष्ट्र रेल्वे, राजपुताना रेल्वे, जयपूर रेल्वे व कच्छ रेल्वे यांचे विलिणीकरण करुन पश्चिम रेल्वे ची स्थापना करण्यात आली.
२००६ : इराकचे माजी अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.
२००७ : गुगलने ने ॲंडरॉइड मोबाइल ऑपरेटिंग सिस्टमचे अनावरण केले.
२०१३ : भारताने मंगळ ऑर्बिटर मोहिमेची सुरूवात केली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७० : स्वातंत्र्य चळवळीतील नेते चित्तरंजन दास यांचा जन्म. (मृत्यू: १६ जून १९२५)
१८८५ : अमेरिकन इतिहासकार व तत्त्वज्ञ विल डुरांट यांचा जन्म. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९८१)
१८९२ : इंग्रजी-भारतीय अनुवांशिक आणि जीवशास्त्रज्ञ जे. बी. एस. हलदाणे यांचा जन्म. (मृत्यू: १ डिसेंबर १९६४)
१९०५ : भारतीय लेखक आणि कवी सज्जनद झहीर यांचा जन्म. (मृत्यू: १३ सप्टेंबर १९७३)
१९०८ : तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व लेखक, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा. राजा राव यांचा जन्म. (मृत्यू: ८ जुलै २००६ ऑस्टिन, न्यू जर्सी, यु. एस. ए.)
१९१३ : ब्रिटिश अभिनेत्री विवियन लेह यांचा जन्म. (मृत्यू: ८ जुलै १९६७)
१९१७ : स्वातंत्र्यसैनिक व हरयाणाचे मुख्यमंत्री बनारसी दास गुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑगस्ट २००७)
१९२१ : ललित कलादर्श ह्या नाट्यसंस्थेचे प्रमुख व संगीत नाटक कलावंत व गायक भालचंद्र पेंढारकर यांचा जन्म.
१९२९ : गीतकार व सर्जनशील कवी प्रा. योगेश्वर अभ्यंकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ नोव्हेंबर २०००)
१९३० : भारतीय नेते अर्जुनसिंह यांचा जन्म. (मृत्यू: ४ मार्च २०११)
१९३२ : पक्षी, वन्याजीवनविषयक ग्रंथकार मारुती चितमपल्ली यांचा सोलापूर येथे जन्म.
१९५२ : भारतीय तत्त्ववेत्ता आणि लेखक वंदना शिवा यांचा जन्म.
१९५५ : पत्रकार करन थापर यांचा जन्म.
१९८८ : क्रिकेटपटू विराट कोहोली यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७९ : प्रकाश हा विद्युत चुंबकीय तरंगांनी बनलेला असतो असा सिद्धांत मांडणारे ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक व गणितज्ञ जेम्स क्लार्क मॅक्सवेल यांचे निधन. (जन्म: १३ जून १८३१ एडिंबर्ग, यु. के.)
१९१५ : राष्ट्रीय सभेचे संस्थापक व मुंबईचा सिंह उर्फ फिरोजशहा मेरवानजी मेहता यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८४५)
१९५० : चतुरंग गवई फय्याझ खाँसाहेब यांचे निधन.
१९९१ : कथालेखिका व कादंबरीकार शकुंतला विष्णू गोगटे यांचे निधन.
२०११ : संगीतकार व गायक भूपेन हजारिका यांचे निधन. (जन्म: ८ सप्टेंबर १९२६)

अतिथंडीमुळे जनावरांवर होवू शकतात हे दुष्परिणाम ; अशी घ्या काळजी

हिवाळ्यात सरासरीपेक्षा कमी तापमान, भरपूर पाण्याची उपलब्धता, मुबलक हिरवा आणि वाळलेला चारा, हवेतील मध्यम आर्द्रता राहते. त्यामुळे हे वातावरण जनावरांच्या आरोग्य व प्रजननास फायदेशिर असतो, तसा त्रासदायकही ठरतो. हिवाळ्यात दुधाळ जनावर पान्हा व्यवस्थित सोडत नाही त्यामुळे दूध उत्पादनात घट होऊन दुधाच्या प्रतिवरही परिणाम होतो. जनावरांच्या त्वचेला भेगा पडतात. अतिथंडीत सडावर भेगा पडून दूध काढताना रक्त येते. अतिथंडीमुळे जनावरांचे स्नायू आखडतात किंवा काही जनावरे लंगडतात. त्यामुळे या काळात गाय, म्हैस, बैल, रेडा यांसारख्या जनावरांची काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे.



अशी घ्या काळजी : थंडीच्या दिवसात जनावरे पाणी कमी पितात. त्यामुळे त्यांची पचनसंस्था व्यवस्थित काम करत नाही. त्यामुळे त्यांच्या शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यासाठी जास्त प्रमाणात ऊर्जा खर्च होत असते. त्यामुळे जनावरांना जास्त ऊर्जा मिळेल असे खाद्य द्यावे. हिवाळ्यात जनावरांच्या त्वचेला भेगा पडतात. त्यामुळे त्वचा खरबडीत होवून खाज सुटते म्हणून त्यांच्या त्वचेला एरंडीचे तेल किंवा पेट्रोलियम जेली लावावे, जेणेकरून त्वचा नरम राहील व भेगा पडणार नाहीत. अतिथंडीत सडावर भेगा पडून दूध काढताना रक्त येते. सडाची त्वचा मऊ राहावी, भेगा पडू नये म्हणून ग्लिसरीनचा किंवा पेट्रोलियम जेलीचा वापर करावा. दूध दोहनावेळी कास धुण्यासाठी गरम-कोमट पाण्याचा वापर करावा.

अशी करा उपाययोजना : थंडीच्या दिवसात जनावरांना मुक्त संचार गोठ्यामध्ये ठेवू नये. अशा वेळी जनावरे बंदीस्त गोठ्यात बांधावीत. बाहेरील थंड हवा आत येणार नाही यासाठी गोठ्याच्या खिडकीस रिकाम्या पोत्यांचे किंवा गोणपाटांचे पडदे लावावेत. हे पडदे रात्रभर किंवा जास्त थंडीमध्ये बंद ठेवावेत. उबदारपणा रहावा यासाठी गोठ्यात इलेक्ट्रिक हिटर किंवा जास्त वॅटचे बल्ब लावावेत. जनावरांना बसण्यासाठी भाताचे किंवा गव्हाचे काड, भुसाच्या सहाय्याने गादी तयार करावी. दुपारी ऊन असताना गरम-कोमट पाण्याचा वापर करून जनावरांची अंघोळ करावी.

ऊर्जा मिळेल असे द्या खाद्य : हिवाळ्यात जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यासाठी खनिज मिश्रणाचा समावेश असलेले व जास्त ऊर्जा मिळेल असे खाद्य द्यावे. गाय, म्हशीने व्यवस्थित पान्हा सोडावा, यासाठी कास धुण्यासाठी आणि वासरांना धुण्यासाठी कोमट पाण्याचा वापर करावा. हिवाळ्यात जनावरांनी भरपूर पाणी प्यावे, यासाठी कोमट पाणी उपलब्ध करून द्यावे. दुपारच्या वेळेस जास्तीत जास्त पाणी पिण्यास द्यावे. अति थंडीमुळे बहुवर्षीय चारा पिकांची वाढ हळूहळू होते. त्यामुळे लसूणघास, बरसीम, चवळी यासारख्या हिवाळ्यात वाढणार्या पिकांची लागवड करून चारा उत्पादन करावे. आहारात कडबा किंवा मुरघासाचा वापर करावा. जनावरांची एवढी जरी काळजी घेतली तरी आपण जनावरांचे थंडीपासून संरक्षण करुन त्यांचे आरोग्य चांगले ठेवू शकतो.

ढोबळी मिरची वरील कीड, रोग आणि उपाय

ढोबळी मिरचीच्या पिकाची लागवड ही ऑगस्ट किंवा सप्टेंबर च्या महिन्यामध्ये केली जाते. आपल्या स्वयंपाकात आवर्जून ढोबळी मिरचीचा समावेश असतो.

फुल किडे : हे किडे अतिशय लहान आकाराचे असून रंग फिकट पिवळा असतो पाने खरवडून त्यातून बाहेर येणाऱ्या रसाचे शोषण करतात त्यामुळे पानांच्या कडा वरच्या बाजूला चुरडलेल्या दिसतात. उपाय- या किडीच्या बंदोबस्तासाठी रोप लावणे पासून तीन आठवड्यांनी पिकावर १५ दिवसांच्या अंतराने आठ मिली डायमेथोएट दहा लिटर पाण्यात मिसळून फवारावे.



पांढरी माशी : ही कीड खोडा मधील रस शोषण करते त्यामुळे खोड कमजोर बनतात आणि पाने गळतात आणि झाड सुकते. उपाय -प्रॉपेनोफोस १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

कोळी : ही कीड अतिशय लहान असून किडीचा रंग पिवळसर करडा असतो कोळी पानातील रसाचे शोषण करतात त्यामुळे पानांवर चुरडा दिसू लागतो फुले गळतात फळे वेडीवाकडी होतात आणि फळांचा आकार लहान राहतो.

उपाय- या किडीच्या नियंत्रणासाठी २० ग्रॅम पाण्यात मिसळणारे गंधक दहा लिटर पाण्यात मिसळून त्याची झाडावर फवारणी करावी.

मावा : हे किटक मिरचीच्या कोवळ्या पानांतील आणि शेंड्या तील रसाचे शोषण करतात. उपाय - मिरचीच्या लागवडीनंतर दहा दिवसांनी १५ मिली मोनोक्रोटोफॉस दहा लिटर पाण्यात मिसळून रोपांवर फवारणी करावी.

रोग व्यवस्थापन : मर रोग -हा रोग जमिनीतील बुरशीमुळे होतो लागण झालेली रोपे निस्तेज होतात. उपाय - दहा लिटर पाण्यात ३० ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड मिसळून हे द्रावण गादी वाफे किंवा रोपांच्या मुळांभोवती ओतावे. भुरी -या रोगामुळे मिरचीच्या पानाच्या वरच्या आणि खालच्या बाजूवर पांढरी भुकटी दिसते या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात झाल्यास झाडाची पाने गळतात. उपाय - ३० ग्रॅम पाण्यात मिसळणारे गंधक व १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने पिकावर दोन फवारण्या कराव्यात. फळे कुजने आणि फ़ांद्या वाळणे - या रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या हिरव्या किंवा लाल मिरचीवर वर्तुळाकार खोलगट डाग दिसतो आणि फळावर काळपट चट्टे दिसतात अशी फळे कुजतात आणि गळून पडतात बुरशीमुळे झाडांच्या फांद्या शेंड्याकडून खाली वाळत जातात. उपाय - या रोगाची लक्षणे दिसताच शेंडे कडून त्यांचा नाश करावा तसेच थायरम किंवा डायथेन एम-४५ किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड यापैकी कोणतेही एक बुरशीनाशक औषध २५ ते ३० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून १० दिवसांच्या अंतराने तीन-चार वेळा फवारावे.

सुधारित पद्धतीने पालकाची लागवड

पालक हे वर्षभर मागणी असणारे आणि अत्यंत कमी कालावधीत भरपूर नफा मिळवून देणारे एक प्रमुख पालेभाजी पीक आहे. पालकामध्ये लोह, जीवनसत्त्वे आणि खनिजे भरपूर प्रमाणात असल्याने आरोग्यासाठी ते अतिशय फायदेशीर मानले जाते. सुधारित पद्धतीने पालकाची लागवड कशी करावी, याची संपूर्ण माहिती आज आपण अपहार आहोत.

हवामान आणि जमीन :हवामान: पालकाला थंड हवामान जास्त मानवते, परंतु योग्य नियोजन केल्यास त्याची लागवड वर्षभर (तिन्ही ऋतूंमध्ये) करता येते. उन्हाळ्यात जास्त तापमान असल्यास पालकाला लवकर तुरे (फुलं) येतात, त्यामुळे पानांची गुणवत्ता कमी होते. जमीन: मध्यम ते कसदार, सद्रिय पदार्थांनी समृद्ध आणि उत्तम निचरा असणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू (कि) ६.० ते ७.० च्या दरम्यान असावा. सामू जास्त असलेल्या चोपण जमिनीतही पालक चांगला येतो.

लागवडीचा हंगाम :खरीप (पावसाळी): जून ते जुलै (सध्याचा काळ पावसाळी लागवडीसाठी उत्तम आहे). रब्बी (हिवाळी): सप्टेंबर ते ऑक्टोबर (या काळात उत्पादन सर्वात जास्त आणि दर्जेदार मिळते). उन्हाळी: जानेवारी ते फेब्रुवारी.

सुधारित जाती :पुसा ज्योती: या जातीची पाने मोठी, मऊ आणि गडद हिरव्या रंगाची असतात. या जातीपासून ५ ते ६ कापण्या मिळतात. पुसा हरित: ही जात उन्हाळी हंगामासाठी आणि डोंगराळ भागासाठी उत्तम मानली जाते. ऑल ग्रीन: ही जात लवकर तयार होते आणि हिवाळ्यात एकाच वेळी भरपूर पाने देते. हरीत शोभा: ही जात देखील



रोगप्रतिकारक असून भरपूर उत्पादन देते.

पूर्वतयारी :जमीन उभ्या-आडव्या नांगरणी करून भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीच्या वेळी एकरी ८ ते १० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत व्यवस्थित मिसळावे. वाफे तयार करणे: पावसाळ्यात पाणी साचून राहू नये म्हणून ३ ह्न २ मीटर आकाराचे सपाट वाफे किंवा गादीवाफे (ठरळीशव इशवी) तयार करावेत.

बियाणे आणि पेरणी :एक एकर क्षेत्रासाठी ४ ते ६ किलो बियाणे लागते. पेरणी करताना दोन ओळींत २५ ते ३० सेंमी अंतर ठेवावे आणि बिया २ सेंमी खोलीवर पेराव्यात. बिया फेकण्यापेक्षा ओळीत पेरणे आंतरमशागत आणि काढणीसाठी सोयीचे ठरते.

पाणी आणि खत व्यवस्थापन :पेरणीनंतर लगेच हलके पाणी द्यावे. पावसाळ्यात गरजेनुसार, तर उन्हाळ्यात ४ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पालकाच्या जलद वाढीसाठी पेरणीच्या वेळी आणि प्रत्येक कापणीनंतर एकरी २० ते २५ किलो नत्र (णीशर) दिल्यास पाने लसशशीत आणि हिरवीगार होतात.रोग व कीड नियंत्रण :मर रोग : पावसाळ्यात हा रोग जास्त होतो. याच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी बियांना 'कॅप्टन' किंवा 'थायरम' (३ ग्रॅम प्रति किलो बियाणे) या बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. पाने खाणारी अळी व मावा: पालक ही आपण थेट खाणारी पालेभाजी असल्याने रासायनिक कीटकनाशकांचा वापर टाळावा. कीड नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी.काढणी आणि उत्पादन :पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी पालक पहिल्या काढणीस तयार होतो. काढणी करताना मुख्य मुळाला धक्का न लावता जमिनीपासून २ ते ३ सेंमी वर पाने कापून घ्यावीत. यामुळे वेलीला पुन्हा फुटवा येतो.साधारणपणे १० ते १५ दिवसांच्या अंतराने ४ ते ५ कापण्या करता येतात.योग्य व्यवस्थापन ठेवल्यास एकरी ४ ते ६ टन एकूण उत्पादन सहज मिळते.

ही आहेत तेलबिया पिके

तेलबिया पिके म्हणजे अशी पिके ज्यांच्या बिया किंवा फळांपासून खाण्यायोग्य किंवा औद्योगिक वापरासाठी तेल तयार केले जाते. महाराष्ट्रासह भारतभरात विविध हंगामांत ही पिके घेतली जातात.

प्रमुख तेलबिया पिके आरणि त्यांचे प्रकार -

सोयाबीन : महाराष्ट्रातील खरिपातील सर्वात प्रमुख तेलबिया पीक. यात तेलाचे प्रमाण १८-२०% आणि प्रथिनांचे (झ्रीींशळप) प्रमाण जास्त असते. भुईमूग : खरीप आणि उन्हाळी अशा दोन्ही हंगामांत भुईमुगाची लागवड केली जाते. याच्या बियांमध्ये ४५-५०% तेलाचे प्रमाण असते. सूर्यफूल: हे पीक खरीप, रब्बी आणि उन्हाळी या तिन्ही हंगामांत घेता येते. हृदयासाठी सूर्यफूलाचे तेल अत्यंत उत्तम मानले जाते. करडई : रब्बी हंगामातील हे महत्त्वाचे कोरडवाहू पीक आहे. कमी पाण्यात चांगले उत्पादन मिळते. तीळ : खरीप व उन्हाळी हंगामात तीळ पेरला जातो. तिळाच्या तेलाचा वापर औषधी आणि अन्नप्रक्रिये त मोठ्या प्रमाणावर होतो. मोहरी/राई : रब्बी हंगामात कमी तापमानात हे पीक घेतले जाते. उत्तर आणि मध्य



भारतात मोहरीची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. एरंडी : याच्या तेलाचा वापर प्रामुख्याने औद्योगिक, औषधी आणि ग्रीसिंग उत्पादनांमध्ये केला जातो. खुरासणी / कारळे : हे एक महत्त्वाचे कोरडवाहू तेलबिया पीक आहे, जे प्रामुख्याने आदिवासी व डोंगराळ भागात घेतले जाते.

तेलबिया पिकांचे महत्त्व : आर्थिक फायदा: तेलबिया ही नगदी पिके असल्याने शेतकऱ्यांना यातून त्वरित आणि चांगले आर्थिक उत्पन्न मिळते. उपउत्पादने (पेंड): तेल काढल्यानंतर उरलेली पेंड गुरांसाठी अत्यंत पोषक ढेप/खाद्य म्हणून वापरली जाते. कमी पाण्याची गरज: करडई, तीळ आणि खुरासणी यांसारखी पिके कमी पाण्याखाली आणि कोरडवाहू जमिनीत सहज येतात.

जालना जिल्ह्यात दुष्काळाची तीव्रता लक्षात घेवून पाणी, चारा आणि रोजगारासाठी उपाययोजना करा- पालकमंत्री पंकजा मुंडे

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि ग्रामीण रोजगार या तिन्ही बाबींवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज (दि.०३) आयोजित आढावा बैठकीत जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थिती, पीक नुकसान, पाणीसाठा, चारा टंचाई आणि रोजगार हमीच्या कामांचा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी सविस्तर आढावा घेतला. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जून खोतकर (दृरदृश्यप्रणालीद्वारे), आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, आमदार हिकमत उढाण आणि, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा, पोलीस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, प्रभारी जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.



पालकमंत्री मुंडे यांनी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर झाल्याने पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा व पाणी, पीक नुकसान भरपाई, पीकविमा आणि रोजगार हमी योजनांच्या कामांचे नियोजन प्राधान्याने करण्याच्या सूचना दिल्या. दुष्काळाच्या काळात शेतकरी आणि पशुधनाला कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने आतापासूनच आवश्यक उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे. तसेच ज्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत पिक कर्ज भेटले नाही, बँकांनी त्यांना तात्काळ पिक कर्ज उपलब्ध करुन पिक कर्जाचे उद्दिष्ट पुर्ण करावे. पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय म्हणून जलसंधारण, सिंचन विहिरी, शेततळी, नाला खोलीकरण आणि गाळ काढण्याच्या कामांना गती देण्यावर भर देण्यात यावा. तसेच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीककर्ज पुनर्गठन आणि कर्जवसुलीस स्थगिती देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी. जिल्ह्यातील आठही तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश असल्याने शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये पाणीसाठा मर्यादित असल्याने उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन पाणीपुरवठा, धरणांतील जलसाठा, टँकर व्यवस्थापन आणि जलस्रोतांच्या संवर्धनासाठी प्रशासनाने कार्यपद्धती तयार करावी, अशी सूचना त्यांनी केली. ज्या गावातून टँकरची मागणी होतात तात्काळ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा असे निर्देश दिले. पाण्याचा कुठेही अपव्यय होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. दुष्काळात पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रत्येक तालुक्यात चारा उपलब्धतेकरीता मुरघास तयार करणे, हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा उत्पादन, अझोला निर्मितीसाठी नियोजन करावे. तसेच गाळपेरा क्षेत्राचा चारा उत्पादनासाठी उपयोग करून घ्यावा. जिल्ह्यातील टॅग केलेल्या तसेच टॅग नसलेल्या जनावरांची माहिती संकलीत करुन त्यानुसार आवश्यक चारा आणि पाण्याचे नियोजन करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देतानाच भविष्यातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी रोजगार हमी योजनेतील कामांना जलसंधारणाची जोड द्यावी. नदी-नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, जलस्रोतांचे पुनर्जीवन, बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि पाणी साठवण क्षमता वाढविणाऱ्या कामांना प्राधान्य द्यावे असे निर्देश पालकमंत्री मुंडे यांनी दिले. जिल्ह्यातील वापरात नसलेल्या बारव, विहिरी, विंधन विहिरी तसेच अन्य जलस्रोतांची स्वच्छता, गाळ काढणे आणि आवश्यकतेनुसार पुनर्बांधणीची कामे करावीत. जलस्रोतांची साठवण क्षमता वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. नगरपालिका आणि शहरी भागातील पाणीपुरवठ्याचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. थकीत वीजबिलामुळे बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे चालू (करंट) बिल भरुन सदर योजना तात्काळ सुरू करुन पाणी पुरवठा करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबांवर मानसिक ताणही निर्माण होतो. त्यामुळे गावागावांत शेतकरी समुपदेशन कार्यक्रम राबवून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधावा, असे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने नागरिकांपर्यंत पोहोचावे, त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि गरजू नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे पालकमंत्र्यांनी सांगितले. पाणीटंचाईच्या काळात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून सोपविलेली कामे वेळेत पूर्ण करावीत. राज्य शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देण्याचा निर्णय घेतला असून, ही रक्कम थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यास सुरुवात झाली आहे. जालना जिल्हा प्रशासनाने लाभार्थी शेतकऱ्यांची यादी शासनाकडे अपलोड केली असून, जिल्ह्यातील एकूण ६ लाख ४४ शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम पाठविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. दुष्काळामुळे शेतीचे नुकसान आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना या अग्रिम मदतीतून काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. दैनंदिन गरजा आणि सणासुदीच्या काळातील खर्चासाठी ही रक्कम उपयोगी ठरणार असल्याचे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले. पाणी, चारा आणि रोजगार या तिन्ही प्रश्नांवर केवळ तात्पुरते उपाय न करता नियोजनबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करावीत. पाणीटंचाई आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढवावी आणि रोजगाराची मागणी होताच मजुरांना काम उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी संबंधित यंत्रणांना दिले. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि गतीने काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे लोकप्रतिनिधींनी बैठकीत मांडल्या. पाणीटंचाई, चारा उपलब्धता, शेतीचे नुकसान आणि रोजगाराच्या प्रश्नांवर त्यांनी आपल्या भागातील अडचणी मांडल्या. तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा उपलब्धता आणि रोजगाराची कामे वाढविण्यासह विविध उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी केली. या सूचनांची दखल घेऊन संबंधित विभागांनी आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पीक पंचनामे, पीकविमा, धरणांतील पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, टँकरद्वारे पाणीपुरवठा, पशुधनासाठी चारा, रोजगार हमीची कामे आणि शहरी भागातील पाणीपुरवठा अशा विविध विषयांचा बैठकीत आढावा घेण्यात आला. आगामी काळातील पाणीटंचाई लक्षात घेऊन पाणी पुरवठा करण्यासाठी पर्यायी व्यवस्थेसह सुक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी प्रशासनाला दिले.यावेळी बैठकीस सर्व संबंधीत विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

प्रेम प्रकरणातून १८ वर्षीय अमीर पटेलची हत्या

कुटुंबीयांना ओलीस ठेवून तरुणाला उचलले, मित्रालाही बेदम मारहाण

धाराशिव। प्रतिनिधी

प्रेम प्रकरणाच्या वादातून एका १८ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना तुळजापूर शहरात घडली आहे. अमीर पटेल असे मृत तरुणाचे नाव असून, या घटनेमुळे तुळजापूर शहरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, अमीरला मारहाण करण्यापूर्वी त्याच्या कुटुंबातील सदस्यांना ओलीस ठेवून त्याला घरातून उचलून नेण्यात आल्याचा गंभीर आरोप नातेवाईकांनी केला आहे. या घटनेत अमीरसोबत असलेल्या अरबाज सय्यद या तरुणालाही बेदम मारहाण करण्यात आली असून, त्याच्यावर धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मृत अमीर पटेल याचे तुळजापूर शहरातील एका तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. मात्र, काही काळानंतर हे प्रकरण मिटवण्यात आले होते. असे असतानाही या जुन्या प्रेम प्रकरणाचा राग मनात धरून तरुणीच्या कुटुंबीयांनी अमीरला लक्ष्य केल्याचा आरोप करण्यात येत आहे. याच वादातून अमीरला मारहाण करण्यात आली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या अमीरचा मृत्यू झाला.

या घटनेला आणखी गंभीर वळण मिळाले आहे. अमीरला मारहाण करण्यासाठी आलेल्या लोकांनी त्याच्या कुटुंबातील सदस्यांना ओलीस ठेवल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आहे. त्यानंतर अमीरला जबरदस्तीने घरातून बाहेर नेण्यात आले आणि त्याच्यावर हल्ला करण्यात आला.

जाहीर प्रगटन
मा. श्री. प्रविण आर. शिंदे दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क. १८२६/२०२६
ॲड.बी.एन. तावरे
अंजना भ्र. गंगाराम रांजवण व इतर वि. निरंक

अर्जदार १. अंजना भ्र. गंगाराम रांजवण, वय-६४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. कोल्हारवाडी ता.जि.बीड, २. आशाबाई भ्र. मच्छींद्र सिंघन, वय ४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर, ३. उषा भ्र. गोविंद गोकुळे, वय ४० वर्षे, धंदा-घरकाम, रा. आहेरवडगाव ता.जि.बीड, ४. अर्चना भ्र.शीतल मोहिते, वय ३८ वर्षे, धंदा-घरकाम, रा.६८८/८ ए गल्ली नं.५, धुळेश्वर नगर, कबनुर ता. हाकणंगाले जि. कोल्हापुर, ५. उमा भ्र. ज्ञानदेव सिंघन, वय ३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. कोल्हारवाडी ता. जि. बीड, ६. स्वाती भ्र.बापु नाईक, वय ३४ वर्षे, धंदा-घरकाम, रा.घोरपडे गल्ली, इचलकरंजी, ता. हातकणंगाले जि. कोल्हापुर

विरुध्द निरंक

गैरअर्जदार : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

प्रकरण:- ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत गंगाराम पि. आबाजी रांजवण यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे गंगाराम पि. आबाजी रांजवण हे दिनांक २५/०९/२०२० रोजी राहते घरी मौजे कोल्हारवाडी ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ६ मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारांशिवाय मयतास ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे गंगाराम पि.आबाजी रांजवण रा. कोल्हारवाडी ता. जि. बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन गोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख ०८/१२/२०२६. आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

११% आयात शुल्कास ३१ डिसेंबरची मुदतवाढ; कापूस १ हजाराने घसरला

सुरुवातीस ९,५०० मिळणारा भाव ८,५०० रुपयांवर

वैजापूर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला कापसाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. यंदा दुष्काळामुळे हेक्टरी उत्पादन ४ क्विंटलवर आले असून, सुरुवातीला बाजारात नव्याने दाखल होणाऱ्या कापसाला ९,५०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत भाव मिळाला. मात्र, केंद्र शासनाने परदेशी कापसावरील ११ टक्के आयात शुल्कमाफीला आणखी दोन महिन्यांची मुदतवाढ देत ती ३१ डिसेंबरपर्यंत कायम ठेवल्याने कापसाचे दर १ हजार रुपयांनी घसरून ८,५०० वर आले आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना ऐन दुष्काळात आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

जिल्ह्यात २ लाख ८२ हजार ६०३ हेक्टरवर कपाशीची लागवड असून, प्रतिकूल हवामानामुळे उत्पादन आणि प्रतवारी घसरली आहे. त्यात स्वस्त परदेशी कापसाच्या आयातीमुळे स्थानिक कापसाच्या दरवाढीच्या आशा धूसर झाल्या आहेत. प्रतिहेक्टर चार क्विंटल उत्पादन आणि प्रतिक्विंटल एक हजार रुपयांचा दरदबाव गृहीत धरल्यास जिल्ह्यात कापसाच्या संभाव्य विक्रीमूल्यात ११३ कोटी रुपयांची घट होऊ शकते, असे गणित व्यापारी व जिनिंग उद्योग क्षेत्रातून मांडण्यात येत आहे. जिल्ह्यातील संभाव्य ११.३० लाख क्विंटल कापसापासून ३३ टक्के रुई उतारा गृहीत धरल्यास ७४,५०० गाठी तयार होऊ शकतात. जिनिंग उद्योगाच्या गणितानुसार, प्रतिगाठी एक हजारांचा दरदबाव आल्यास रुईच्या संभाव्य विक्रीमूल्यात ७.४५ कोटी रुपयांची घट होऊ शकते. जिल्ह्यातील २.८२ लाख हेक्टरवर प्रतिहेक्टर चार क्विंटल उत्पादन गृहीत धरल्यास ११.३० लाख क्विंटल कापूस बाजारात येऊ शकतो. व्यापारी व जिनिंग उद्योगाच्या अंदाजानुसार, प्रतिक्विंटल ५०० रुपयांचा दरदबाव निर्माण झाल्यास विक्रीमूल्यात ५६.५० कोटी, तर एक हजार रुपयांचा दबाव आल्यास ११३ कोटी रुपयांची घट होऊ शकते. शुल्कमाफीच्या मुदतवाढीमुळे कापसाच्या दराला निश्चितच मोठा फटका बसण्याची भीती आहे. चांगला भाव मिळण्यासाठी परदेशात कापूस निर्यातीला प्रोत्साहन देणे आणि आवश्यक शुल्क सवलतीचा विचार करणे गरजेचे आहे. - दीपक गवळी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर

शांतीलाल पहाडे, अध्यक्ष, भाग्योदय जिनिंग उद्योग, वैजापूर आयात शुल्कमाफीच्या मुदतवाढीमुळे कापसाच्या दरावर दबाव राहण्याची शक्यता आहे. यंदा उत्पादन आणि प्रतवारी घटल्याने जिनिंग उद्योगाचे गणित आधीच बिघडले आहे. परदेशी कापूस स्वस्त उपलब्ध झाल्यास रुईच्या मागणीवर परिणाम होऊ शकतो.

जाहीर प्रगटन
मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज ४४६/२०२६
ॲड. आर. एस. घुले
गंगुबाई व इतर विरुध्द निरंक मार्फत

अर्जदार : १. गंगुबाई पाटीलबुवा सानप, रा. सौताडा ता. पाटोदा जि. बीड २. सुलाबाई भालचंद सानप, रा. सौताडा ता. पाटोदा जि. बीड ३. समाधान भालचंद सानप, रा. सौताडा ता. पाटोदा जि. बीड

विरूध्द कोणीही नाही

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ वे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भालचंद पाटीलबुवा सानप, हे रा. मौजे सौताडा, ता. पाटोदा जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी भालचंद पाटीलबुवा सानप, यांचा मृत्यु दिनांक १०/१०/२०२६ रोजी सौताडा, ता. पाटोदा जि. बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ही मयताची आई असून अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी आहे तसेच अर्जदार क्र. ३ हे मयताचा एकुलता एक मुलगा आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत भालचंद पाटीलबुवा सानप, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १० डिसेंबर २०२६.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

आदेशावरुन,
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड.

पाथर्डी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या वतीने वनदेव डोंगरात वन्यजीव -पशूंसाठी पानवठे सुरू

पाथर्डी । प्रतिनिधी

टंचाईग्रस्त गाव वाडी वस्ती तांडा येथे टँकरचे पाणी सुरू आहे मात्र वन्यजीव पशुपक्षी व अन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी जागरूक नागरिकांसह जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे योगदान आवश्यक आहे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले त्याला प्रतिसाद म्हणून पाथर्डी पंचायत समितीच्या ग्रामपंचायत अधिकारी संघटना आणि मित्रपरिवाराच्या मदतीने जिल्ह्यातील पाथर्डी शहरानजीक असलेल्या वनदेव डोंगर येथे पाणवठा पाथर्डी तालुक्यात समारंभपूर्वक सुरू करण्यात आला पाथर्डी शहरालगत वनदेव निसर्ग परिचय केंद्र आहे.



या परिसरात शहरातील हजारो नागरिक सकाळ सायंकाळ फिरण्यासाठी येतात सर्व दृष्टीने आरोग्यवर्धक असा हा परिसर पाथर्डीकर यांच्या आवडीचा आहे येथे विविध प्रकारचे वन्यजीव वावरतात विशेषतः ससे लांडगे कोल्हे मुंगूस तरस सायाळ हरीण विविध प्रकारचे सरपटणारे प्राणी याबरोबरच भटकी जनावरे भटके कुत्रे मोठ्या प्रमाणात आहेत दररोज सकाळ सायंकाळ विविध प्रजातींचे पक्षी मोठ्या प्रमाणावर अन्नपाण्यासाठी येथे जमतात शहरातील फिरायला येणारे काही नागरिक पक्षांसाठी धान्य शिळे अन्न व अन्य प्रकारचे खाद्यपदार्थ आणतात या जॉगिंग ट्रॅक सारख्या ट्रॅकवर लोकांनी छोटी मडकी प्लॅस्टिकचे छोटे डबे पाण्यासाठी ठेवून त्यामध्ये पाणी टाकले जाते वनविभागाच्या प्रवेशद्वारापासून देवी मंदिराकडे जाणाऱ्या घाट रस्त्याच्या डाव्या बाजूला सुमारे ५००० लिटर क्षमतेचा वनविभागाचा पाणवठा आहे यामध्ये आगामी पावसाळ्यापर्यंत गरजेनुसार नियमित पाणी टाकण्याचा निर्णय पंचायत समिती अधिकारी संघटनेने घेतला आहे गटविकास अधिकारी राजेंद्र धस अतिरिक्त गटविकास अधिकारी राजेंद्र मस्के दत्तात्रय रानमळ संजय गिऱ्हे रोहिदास आघाव हनुमान खेडकर प्रमोद म्हस्के कृष्णा खटावकर राहुल गाडेकर सचिन नजन गोपीचंद रोंडे महादेव हाडके सुनील वाघ विनोद ओतारी नितीन बटुळे राजेंद्र ढाळे सुरेंद्र बर्डे नारायण डमाळे कैलास अकोलकर अनिल लवांडे महारुद्र बडे अमोल भवार संदीप ढाकणे मनोरमा कंठाळी गीता सांगळे अनिता बनसोडे यासह सर्व कर्मचारी आगामी कालावधीसाठी योगदान देणार आहेत पाथर्डी पंचायत समिती शासकीय कर्मचाऱ्यांनी अशा पद्धतीने दुष्काळी परिस्थितीची जाणीव ठेवून काम केल्यास दुष्काळग्रस्त जनतेला सुद्धा दिलासा व प्रेरणा मिळणार आहे.

शिक्षकासह ५० व्यक्तींना गंडा घालणारा मुख्य सुत्रधार आरोपी गजाआड

जालना । प्रतिनिधी

मार्केटिंग मध्ये बाबा ट्रेंडींग नावाने व्यवसाय सुरु करुन आरोपीचे बाबा ट्रेंडींग व कंपनी मध्ये गुंतवणुक केल्यास तिन पठ लाभ मिळतो असे लाभाचे आमिष देऊन गुंतवणुकदारांना त्यामध्ये गुंतवणुक करण्यास भाग पाडले आणि मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक करुन घेऊन नंतर पसार झालेल्या आरोपीच्या आर्थिक शाखा जालना यांनी आवळल्या मुसक्या.जालना शहरातील शेरसवार नगर येथील तक्रारदार मोहम्मद फेरोज अब्दुल सत्तार व्यवसाय शीक्षक यांचेसह त्यांचे भाऊ व त्यांचे जवळचे ५० गुंतवणुकदारांकडुन यां कपनीमध्ये गुंतवणुक केल्यास वर्षाला तीनपट रक्कम करुन देण्याचे आमीष देवुन फसवणुक करणाऱ्या टोळीतील तीन आरोपी विरुध्द दिनांक ०३/१०/२०२६ रोजी पोलीस ठाणे कदिम जालना येथे गुन्हा रजि. क्रंमाक ५६४/२०२६ कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३५१(२), ३५२, ६१(२), ३(५) सह कलम ३,४,५ कायद्या प्रमाणे यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी वरुन गुन्हा नोंद असुन गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक जालना यांचे आदेशान्वये आर्थीक गुन्हे शाखा जालना करत आहेत.



तक्रारदार यांचेसह इतर व्यक्तींचे १,३२,०५,०००/- रुपये रक्कमेची फसवणुक करुन फरार असलेल्या आरोपींचा शोध पोलीस घेत यापुर्वी १) वसिम अहेमद अब्दुल गफार वय ३७ वर्षे रा. इतवार गल्ली, कचेरी रोड जुना जालना २) मोहम्मद युनुस अहेमद मोहम्मद सलीम वय ३४ वर्षे रा. रा. इतवार गल्ली, कचेरी रोड जुना जालना यांना दिनांक ०७/१०/२०२६ रोजी अटक केलेली आहे. दोन्ही आरोपी सध्या मा.न्यायालयाचे आदेशान्वये जेल मध्ये आहेत. गुन्हयातील मुख्य सुत्रधार आरोपी मो.एजाज मो.रफिक सलाट हा गुन्हा नोंद झाल्यापासुन फरार असल्याने व तो मोबाईल वापरत नसल्यामुळे आरोपीचा ठाव ठिकाणा मिळण्यास अडसर होत होता अशा वेळी आर्थिक गुन्हे शाखेने अत्यंत गोपणीय रित्या खबऱ्या मार्फत माहीती मिळवुन आरोपी हा बांद्रा मुंबई येथे असल्याची माहीती मिळताच वरीष्ठांचे मार्गदर्शना प्रमाणे स्थानिक पोलीसांची तपासात मदत घेऊन पोलीस ठाणे निर्मल नगर बांद्रा मुंबई येथे पोहचुन आरोपी नामे मोहम्मद एजाज मोहम्मद रफीक सलाट याचा पो स्टे निर्मलनगर बांद्रा येथील सपोनि श्री अण्णासाहेब कदम, गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक श्री संतोष कोळगे व गुन्हे प्रगटींकरण पथकातील अंमलदार यांची तपास मदत घेऊन आरोपी एजाज सलाट यास निर्मलनगर पो.स्टे.बांद्रा मुंबई येथुन रात्री ०१:०० वा अटक केली. आरोपीस जालना येथे आणुन आरोपीची अटकेची संपुर्ण कायदेशीर प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर त्यास मा.जिल्हा व सत्र न्यायालय न्यायालया समक्ष हजर केले असता आरोपीची तपास कामी ०५ दिवसाची मा.कोर्टाने मंजुर केली आहे. गुन्हयातील आरोपीतांनी गुंतवणुकदारांना वर्षाकाठी तीनपट रक्कम करुन देण्याचे आमीष देवुन गुन्हा केलेला असल्याने गुंतवणुकदारांची संख्या वाढण्याची शक्यत असुन ज्यांनी कोणी या कंपनीमध्ये आरोपींच्या आमीषाला बळी पडुन गुंतवणुक केली असेल त्यांनी आर्थीक गुन्हे शाखा येथे येवुन तक्रारी अर्ज सादर करण्याचे अवाहन केले आहे. सदरची कामगीरी ही मा. श्री तेघबिरसिंह संधु पोलीस अधीक्षक , डॉ.श्री विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक , श्री बाळासाहेब पवार, पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा , यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक, श्री शैलेश म्हस्के पोलीस उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, श्रेयस वाघमारे, गोंविद दराडे, महीला अंमलदार मंदा नाटकर यांनी पार पाडली.

दैनिक
राज्य लोकतंत्र
गुरूवार दि.०५ नोव्हेंबर २०२६ | ६

वडवणी तालुक्यातील सिंचन प्रश्न सोडविण्यासाठी अभ्यासपूर्ण आराखडा तयार करावा

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील अप्पर (ऊर्ध्व) कुंडलिका प्रकल्प परिसरातील शेतकऱ्यांची सिंचनाची मागणी लक्षात घेता, अप्पर कुंडलिका प्रकल्पाचे पाणी सध्या अस्तित्वात असलेल्या तलावांमध्ये साठवून त्याद्वारे सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देता येईल का, याची व्यवहार्यता तपासावी, तसेच उपलब्ध जलस्रोत, सिंचनाची गरज आणि संभाव्य लाभक्षेत्र यांचा विचार करून सर्वंकष व अभ्यासपूर्ण आराखडा तयार करावा, असे निर्देश मंत्री मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

वडवणी तालुक्यातील अप्पर (ऊर्ध्व) कुंडलिका प्रकल्प, सोन्नाखोटा डावा कालव्याचे अपूर्ण काम तसेच परिसरातील तांड्यांच्या सिंचनाच्या प्रश्नांवर मंत्रालयात मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत बिचकुलदरा तांडा, सरकारखोरी तांडा आणि चौफाळदरा तांडा परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या परिसरातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अप्पर कुंडलिका प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला. तसेच सोन्नाखोटा डावा कालव्याचे अपूर्ण काम पूर्ण करणे आणि संबंधित तांड्यांच्या परिसरातील लाभक्षेत्र वाढविण्याबाबत चर्चा झाली.

मृद व जलसंधारण विभागांतर्गत असलेल्या पाझर तलावांच्या दुरुस्तीचे



प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचनाही मंत्री राठोड यांनी दिल्या. याशिवाय परिसरात नवीन जलसंधारण तलाव मंजूर करण्याच्या प्रस्तावावरही बैठकीत चर्चा करण्यात आली.

उपलब्ध जलस्रोत, सिंचनाची गरज आणि संभाव्य लाभक्षेत्र यांचा विचार करून सर्वंकष व अभ्यासपूर्ण आराखडा तयार करून सादर करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यामुळे उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करून परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करता येणार आहेत.

या उपाययोजनांमुळे बिचकुलदरा, सरकारखोरी आणि चौफाळदरा तांडा परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यास मदत होणार आहे. बैठकीस विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्यासह जलसंपदा व मृद व जलसंधारण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दुष्काळी परिस्थितीत एकनाथ शिंदे यांनी ऊसतोड कामगारांची दिवाळी गोड केली : मनोज शिंदे

प्रत्येक ऊसतोड कामगारांच्या घरात दिवाळीचा शिधा पोहोच करणार : सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी

राज्यातील कष्टकरी, शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची भूमिका शिवसेनेने नेहमीच जपली आहे. ऊसतोड कामगारांचे योगदान मोठे असून त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांच्या कुटुंबांच्या आनंदात सहभागी होणे ही आपली जबाबदारी आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कायम कष्टकरी आणि गरजू घटकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन प्रत्येक ऊसतोड कामगाराची दिवाळी गोड करणारा असे प्रतिपादन शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे

शिवसेनेच्या वतीने केज येथे हजारो ऊसतोड कामगारांना शिधा वाटप

यांनी केले. तर ऊसतोड कामगारांच्या हितासाठी शिवसेना कटिबद्ध असून प्रत्येक ऊसतोड कामगारांच्या घरात शिधा पोहोच करणार असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या व्यक्त केले.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने शिवसेनेच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांना दिवाळीनिमित्त शिधा वाटपाचा कार्यक्रम मंगळवारी (दि.३) केज तालुक्यातील गंगामाऊली शुगर येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या हस्ते जवळपास १२०० ऊसतोड कामगारांना शिधा (किराणा सामना) वाटप करण्यात आले. शिवसेना बीड जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमाला शिवसेनेचे पदाधिकारी आणि शिवसैनिकांची उपस्थिती होती.



यावेळी मनोज शिंदे म्हणाले की, जिल्ह्यातील हजारो कुटुंबे दरवर्षी ऊसतोडीसाठी आपल्या गावापासून दूर जातात. कुटुंबापासून दूर राहून ऊन, वारा, ◀◀ पान ३ वर

गेवराईत युवकावर तलवारीने हल्ला, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

गेवराई । प्रतिनिधी

दुध आणायला गेलेल्या एका युवकावर धारदार तलवारीने डोक्यावर हल्ला करून गंभीर जखमी



केल्याची घटना शनिवार ता. ३१ रोजी सायंकाळी सात वाजता शहरातील बौद्ध विहारा समोर घडली असून, अजय संजय सुतार वय वर्ष २८ रा. वीर लहुजी नगर गेवराई यांच्या डोक्यात आणि गालावर, हातावर गंभीर जखमा झाल्याने २० टाके पडून जखमी झाले आहेत. या प्रकरणात गेवराई पोलीसांनी दोघांविरुद्ध बीएनएस कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेतील आरोपी फरार असून, पोलीस तपास करत आहेत.

अजय संजय सुतार वय वर्ष २८ रा. वीर लहुजी नगर गेवराई ता. गेवराई जि.बीड यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, ३१ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ७ वा. सुमारास मी दुध आणण्यासाठी शास्त्री चौकाकडे जात आसताना भिम नगर येथे बौध्द विहार समोर आलो असता तिथे दबा धरून बसलेल्या अजय जीतू कांडेकर , विजय जितू कांडेकर व आणखी एका अनोळखी व्यक्तीने, माझ्या चुलत्याशी झालेल्या भांडणाचे कारण काढुन, अजयने माझ्या डोक्यात तलवार मारुन मला गंभीर जखमी केले. माझ्यावर हल्ला करून,त्यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच, तुझा चुलता आमच्या हातून वाचला आहे. तुला पण सोडणार नाही, अशी धमकी देत तिघांनी मिळून तलवार आणि कत्तीने मारहाण केली. या प्रकरणी गेवराई पोलिसांत बीएनएस कलम २५,११५,११८२,३५,३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तपास करत आहेत.

मुख्यमंत्री सहायता निधीतून आष्टी तालुक्यातील तीन रुग्णांना प्रत्येकी ५० हजारांची वैद्यकीय मदत मंजूर

आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नांना यश!

आष्टी । प्रतिनिधी

आर्थिक परिस्थितीमुळे गंभीर आजारांवरील उपचार घेणे अनेक कुटुंबांसाठी आव्हानात्मक ठरत असताना गरजू रुग्णांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून आष्टी तालुक्यातील तीन रुग्णांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नातून ही मदत



उपलब्ध झाली आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीतून खडकत येथील दादासाहेब रावडे यांच्या वैद्यकीय उपचारासाठी ५० हजार रुपये मंजूर करण्यात आले. तसेच आष्टी येथील आबासाहेब साबळे यांच्या उपचारासाठीही ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर झाले आहे.याशिवाय खुंटेफळ (ता. आष्टी) येथील कल्याणी कोहक यांच्या नवजात बाळाच्या वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. आष्टी तालुक्यातील तीन गरजू रुग्णांना एकूण १ लाख ५० हजार रुपयांची वैद्यकीय मदत मंजूर झाली आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचारांमध्ये अडथळे येऊ ◀◀ पान ३ वर

परळीच्या जनता दरबारात ना. पंकजाताई मुंडेंना चिमुकल्याचा निरागस नमस्कार ; पंकजाताईंनी काम थांबवून साधला संवाद

चॉकलेट देत केले कौतुक; काही क्षणांच्या भावनिक प्रसंगाने उपस्थितांचे वेधले लक्ष

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

जनतेच्या समस्या ऐकण्यासाठी परळीत आयोजित केलेल्या जनता दरबारात एका चिमुकल्याच्या निरागस कृतीने काही क्षणांसाठी वातावरण हलकेफुलके झाले. सुरुवातीला सभागृहात रडत असलेला हा चिमुकला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासमोर येताच हसू लागला. एवढेच नव्हे, तर त्याने हात जोडून त्यांना नमस्कारही केला. या अनपेक्षित कृतीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.



पंकजाताई मुंडे याही या निरागस क्षणांमध्ये काही काळ बालविश्वात रममान झाल्याचे बघायला मिळाले.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचा आज परळी येथे जनता दरबार होता.या जनता दरबारात जनतेची गाऱ्हाणी व तक्रारींचा निपटारा करत असताना सभागृहात उपस्थित अभ्यागता मध्येलहान मूल रडण्याचा आवाज घुमला. हा रडण्याचा आवाज ऐकताच 'अरे कोणाशी बाळ रडत आहे त्यांना अगोदर पाठवा' अशी सूचना पंकजाताईंनी आपल्या कर्मचाऱ्यांना दिली. जेव्हा आपल्या आई समवेत हे बाळ पंकजाताई समोर आले त्यावेळी अगोदर रडणारा हा चिमुकला ताईसमोर येतात मात्र हसत नमस्कार घालू लागला. या चिमुकल्याचा नमस्कार

पाहून पंकजाताई मुंडे यांनीही जनता दरबारातील आपले कामकाज काही काळ थांबवले. त्याच्याशी हसत-खेळत संवाद साधत त्या त्याच्या निरागस बालविश्वात रमल्या. त्याचे कौतुक करत त्यांनी त्याला चॉकलेटही दिले. ताईंच्या या सहज आणि आपुलकीच्या ◀◀ पान ३ वर

पतसंस्था आणि पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून प्रश्न सोडविण्यावर भर; फेडरेशनचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्जवसुलीच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणींवर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी तसेच पतसंस्था आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने बीड तालुका पतसंस्था फेडरेशनच्या वतीने मा. पोलीस अधीक्षक, बीड यांना निवेदन देण्यात आले.

फेडरेशनचे अध्यक्ष कल्याण आखाडे व उपाध्यक्ष ड प्रकाश कवठेकर, शिवाजी देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर



करण्यात आले. पतसंस्था क्षेत्रातील विविध प्रश्न आणि अडचणी सोडविण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल फेडरेशनच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले. पोलीस प्रशासन नेहमीच कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच सर्वसामान्य नागरिक आणि सहकार क्षेत्राच्या अडचणी समजून घेऊन सकारात्मक भूमिका घेत आहे. याच सहकार्याच्या भावनेतून पतसंस्था क्षेत्रातील काही प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करून समन्वयाने मार्ग काढण्याची भूमिका फेडरेशनने मांडली.

पतसंस्था या सर्वसामान्य नागरिक, छोटे व्यावसायिक आणि ठेवीदारांसाठी आर्थिक आधाराचे महत्त्वपूर्ण माध्यम आहेत. ठेवीदारांच्या ठेवींचे संरक्षण करणे आणि थकीत कर्जाची वसुली करणे ही संस्थांची महत्त्वाची जबाबदारी आहे. कर्जवसुलीची प्रक्रिया कायदेशीर मार्गाने राबविताना पदाधिकारी ◀◀ पान ३ वर

रॅपिडो बाईक टॅक्सी सेवेसाठीचे ॲप वापरणे टाळावे बीडमधील नागरिकांना विपुल पिंगळे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात रॅपिडो कंपनीच्या बाईक टॅक्सी सेवेसंदर्भात सुरू असलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी बीड शहरातील नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. नागरिकांनी रॅपिडो कंपनीचे बाईक टॅक्सी प वापरणे टाळावे, तसेच कोणत्याही दुचाकी वाहनमालकांनी आपली वाहने रॅपिडो पवर नोंदणीकृत (जपलेरीव) करू नयेत, असे त्यांनी म्हटले आहे.

यापूर्वीही बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून रॅपिडो बाईक टॅक्सी सेवेसंदर्भात नागरिकांना आवाहन करण्यात आले होते. सध्या बीड शहरात रॅपिडोच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या दुचाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. या कारवाईमध्ये संबंधित दुचाकी वाहनमालकांना आर्थिक दंडाला सामोरे जावे लागत असून, नियमानुसार गुन्हे दाखल होण्याचीही शक्यता आहे.

विशेष म्हणजे, रॅपिडो कंपनीच्या माध्यमातून व्यवसाय करणाऱ्या वाहनमालकांवर कारवाई होत असताना कंपनीला थेट दंडाचा फटका बसत नाही. मात्र, प्रत्यक्ष कारवाईचा आर्थिक आणि कायदेशीर परिणाम दुचाकी मालकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे केवळ काही उत्पन्नाच्या अपेक्षेने वाहनमालकांनी स्वतःला कायदेशीर अडचणीत आणू नये, असे पिंगळे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, रॅपिडो कंपनीचे प बंद करण्यासाठी बीड आरटीओ कार्यालयाकडून आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. त्यामुळे नागरिकांनी आणि दुचाकी वाहनमालकांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी, असे आवाहन विपुल पिंगळे यांनी केले आहे.

रॅपिडोच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक करताना कारवाईचा सामना करण्यापेक्षा वाहनमालकांनी वेळीच सावध होऊन कायदेशीर अडचणी टाळाव्यात, हा या आवाहनामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

पाटोदा तालुक्यातील अनेक शिधा धारकांचे धान्य वितरण थांबविले

पाटोदा प्रतिनिधी

भीषण दुष्काळी परिस्थिती व तसेच दीपावलीच्या शुभ मुहूर्तावर

शासनाच्या 'मिशन सुधार' मोहिमेचा फटका पाटोदा तालुक्यातील हजारो शिधापत्रिकाधारकांना बसला असून, तब्बल ३ हजार ८०० लाभार्थ्यांचे स्वस्त धान्य वितरण बंद करण्यात आले आहे.कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन संबंधितांचे रेशन बंद करण्यात आलेले असल्याची माहिती पाटोदा पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार एस.ए.मुल्ला यांनी दिली.

अपात्र लाभार्थ्यांना योजनेतून वगळण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या या मोहिमेमुळे पात्रतेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. धान्य बंद झाल्याचे समजताच संबंधित कुटुंबांनी कारणांची माहिती घेण्यासाठी आणि धान्य पुन्हा सुरू करण्याच्या प्रक्रियेची चौकशी करण्यासाठी तहसील कार्यालयाकडे धाव घेतली आहे.

पाटोदा तालुक्यात १३१ रेशन दुकानदार आहेत अंत्योदय योजनेतील कुटुंबांना दरमहा ३५ किलो, तर प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती पाच किलो अन्नधान्य दिले जाते. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत केंद्र शासनाच्या निर्णयानुसार पात्र लाभार्थ्यांना ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत मोफत धान्य वितरणाची तरतूद आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गैरप्रकारांना आळा घालून अन्नसुरक्षा योजनेचा लाभ केवळ पात्र कुटुंबांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून 'मिशन सुधार' राबविण्यात येत असल्याचे पाटोदा नायब तहसीलदार (पुरवठा अधिकारी) एस.ए.मुल्ला .म्हणाले.

शिधापत्रिकांवरील लाभार्थ्यांची विविध निकषांच्या आधारे छाननी केली जात आहे. मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित कुटुंबे, दुबार नोंदी, आधारविषयक त्रुटी, प्राप्तिकर किंवा जीएसटी भरणारे, चारचाकी वाहनधारक, विविध संस्थांचे संचालक, पेन्शनधारक तसेच निर्धारित उत्पन्न मर्यादेपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांच्या नोंदी तपासल्या जात आहेत. शासनाकडून प्राप्त झालेल्या संभाव्य अपात्र लाभार्थ्यांच्या याद्यांची स्थानिक पातळीवर पडताळणी केली जात आहे. यामध्ये वार्षिक एक लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांचाही समावेश आहे. या प्रक्रियेत पाटोदा तालुक्यातील ३ हजार ८०० शिधापत्रिकाधारकांचे धान्य वितरण थांबविण्यात आले आहे.

दरम्यान ९ ऑक्टोबर २०२६ रोजी शासनाने दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा सुरळीत पुरवठा करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे पडताळणीच्या प्रक्रियेत पात्र कुटुंबांवर अन्याय होऊ नये आणि तांत्रिक कारणांमुळे बंद झालेले धान्य तातडीने पूर्ववत व्हावे, अशी अपेक्षा लाभार्थ्यांकडून व्यक्त होत आहे.

निकषांनुसार पडताळणी सुरू

विविध संस्थांचे संचालक, चारचाकी वाहनधारक, प्राप्तिकर भरणारे, पेन्शनधारक असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी तपासल्या जात आहेत. संबंधित याद्यांची पडताळणी करून शासनाच्या निकषांनुसार अपात्र लाभार्थ्यांबाबत पुढील कारवाई करण्यात येईल. यामुळे पात्र आणि गरजू कुटुंबांनाच अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मिळण्यास मदत होईल. असे पाटोदा पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार एस.ए.मुल्ला म्हणाले.

कर्जमुक्ती योजने अंतर्गत ५७,८७३ शेतकऱ्यांच्या खात्यावर ५८९.९३ कोटी रुपये जमा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत बीड जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. शासनाने जाहीर केलेल्या चौथ्या यादीनुसार जिल्ह्यातील ५७,८७३ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर तब्बल ५८९ कोटी ९३ लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजनेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. चौथ्या यादीतील लाभ दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी जाहीर झालेल्या चौथ्या यादीत बीड जिल्ह्यातील ५७,८७३ शेतकऱ्यांना ५८९.९३ कोटी रुपयांचा लाभ मिळाला आहे. यामध्ये बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून पीक कर्ज घेतलेल्या १,४८७ शेतकऱ्यांचे ६.९५ कोटी रुपये, तर उर्वरित रक्कम राष्ट्रीयकृत बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली आहे.

यापूर्वी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या यादीमधील राष्ट्रीयकृत बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १,१०,८७८ शेतकऱ्यांच्या एकूण ९१८.५६ कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीला मंजुरी मिळाली होती. आतापर्यंत बीड जिल्ह्यातील एकूण १,६८,७५१ शेतकऱ्यांना १५०८.४९ कोटी रुपये इतक्या विक्रमी रकमेची कर्जमुक्ती या योजनेमुळे मिळाली आहे.

शासनाच्या या योजनेचा लाभ मिळावा यासाठी यापूर्वी पहिल्या, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26